संपादकीय


## अळी मिळी गुप चिळी देशासाठी घातक !

जॉन एफ केनेडी राष्ट्रपती असताना त्यांचे विश्वासू आणि जागतिक कीर्तीचे अर्थतज्ज्ञ जॉन केनेथ गालब्रेथ हे अमेरिकेचे भारतातील राजदूत होते. त्यांनी तेव्हा भारतातील लोकशाहीला 'फंक्शनिंग अनार्की' (चालणारी बेबंदशाही) असे संबोधले होते. आज ज्या प्रकारे घटना घडत आहेत आणि त्यावर सत्ताधाऱ्यांच्या ज्या प्रतिक्रिया येत आहेत त्यावरून असेच काहीसे देशात सुरु आहे असे वाटावे.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com








बीड – महाराष्ट्र वर्ष – ४ अंक–३०३ मंगळवार, दि.२५ फेब्रुवारी २०२५ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 पाने– ६ किंमत ३ रूपये


# राज्यातील शेतकऱ्यांच्या ठिबक सिंचन योजनेचे सातशे सोळा कोटी रुपये थकले

## योजना निवडणुकीपूरती होती का?–ॲड.अजित देशमुख

बीड । प्रतिनिधी

**राज्यात गेल्या वेळेच्या सरकारने निवडणुकीच्या तोंडावर अनेक योजना राबविल्या. आता त्या योजना बंद होत आहेत. लाभार्थी कमी होत आहेत. अशीच शेतकऱ्यांच्या ठिबक सिंचन योजनेची कथा झाली आहे. सन २०२३–२४ मध्ये राज्यात मागेल त्याला ठिबक सिंचन योजना राबविण्यात आली. निवडणुकीनंतर आता सातशे सोळा कोटी रुपयांचा निधी थकलेला असतानाही शेतकऱ्यांना दिला जात नाही. त्यामुळे ही योजना निवडणुकी पूरती होती का ? असा आरोप जन आंदोलनाचे ॲड. अजित एम. देशमुख यांनी केला आहे.**



शेतकऱ्यांना अनुदानावर ठिबक सिंचन पुरविण्यात येते. जवळपास एक लाख तीस हजारावर शेतकऱ्यांना सन २०२३–२४ या आर्थिक वर्षात या योजनेचे लाभार्थी ठरविण्यात आले होते. केंद्र सरकारने या योजनेसाठी तीनशे कोटी रुपयांची अनुदान दिला देखील. मात्र नियोजनाप्रमाणे सरकारने ही योजना राबवली नाही आणि कृषी खाते यात सपशेल फेल ठरले.

ज्या शेतकऱ्यांनी या योजनेत भाग घेतला, त्या एक लाख तीस हजार शेतकऱ्यांना आता ७१६ कोटी रुपयांचा निधी देणे आवश्यक आहे. मात्र ठिबक सिंचन योजनेतील हे अनुदान पान २ वर

## पीएम किसान योजनेचा १९ वा हप्ता शेतकऱ्यांच्या खात्यात जमा

भागलपूर । वृत्तसंस्था

**पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेच्या १९ व्या हप्त्यापोटी लाभार्थी शेतकऱ्यांच्या खात्यात दोन हजार रूपये जमा झाले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी बिहारमधील भागलपूर येथून पीएम किसान योजनेचा १९ वा हप्ता जारी केला. यामुळे देशातील सुमारे ९.८ कोटी शेतकऱ्यांच्या खात्यात डीबीटीद्वारे २२ हजार कोटी रुपये जमा झाले आहेत.**



प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत, केंद्र सरकार देशातील गरीब शेतकऱ्यांना दरवर्षी ६ हजार रुपयांची आर्थिक मदत देते. तीन हप्त्यांमध्ये ६ हजार रुपयांची ही आर्थिक मदत दिली जाते. या योजनेला ६ वर्षे पूर्ण झाली आहेत. १९ वा हप्ता शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यापूर्वी पंतप्रधान मोदी यांनी देशभरातील शेतकऱ्यांना शुभेच्छा दिल्या. ते म्हणाले, पीएम किसान योजनेला ६ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल देशभरातील आपल्या शेतकरी बंधू–भगिनींना खूप खूप शुभेच्छा. पान २ वर

# शेतकऱ्यांना आता वार्षीक बारा ऐवजी १५ हजार देणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची घोषणा

मुंबई । प्रतिनिधी

**शेतकऱ्यांना लवकरच पीएम किसान आणि नमो शेतकरी महासन्मान निधीतून वार्षिक १२ ऐवजी १५ हजार रुपये देण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी (दि.२४) केली आहे. पीएम किसान सन्मान योजनेच्या १९ व्या हप्त्याचे वितरण सोहळ्या निमित्त वसंतराव नाईक कृषी विस्तार प्रशिक्षण संस्थेमध्ये आयोजित कार्यक्रमात फडणवीस बोलत होते.**

यावेळी फडणवीस म्हणाले, ''पीएम किसान आणि नमो शेतकरी सन्मान योजनेच्या माध्यमातून १२ हजार रुपये दिले जातात. परंतु त्यामध्ये आता तीन हजार रुपयांची अतिरिक्त





भर टाकली जाणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना वर्षाला १५ हजार रुपये दिले जाणार आहेत, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. यावेळी फडणवीसांनी विरोधकांनाही टोला लगावला. फडणवीस पुढे म्हणाले, नमो शेतकरी सन्मान निधी योजनेवर विरोधक सुरुवातीला टिका करत होते. हस्यास्पद टिका टिपणी करत होते. परंतु शेती व्यवस्थापन करणाऱ्या शेतकऱ्यांना अडचणीच्या काळात काहींच्या मते थोडीशी असलेली ही रक्कम मोठा दिलासा ठरली आहे, असा दावाही फडणवीसांनी केला. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते बिहार येथील भागलपुरमध्ये पीएम किसान योजनेच्या १९ व्या हप्त्याचे वितरण करण्यात आले. यामध्ये १९ व्या हप्त्याचे ९ कोटी ८० शेतकऱ्यांच्या खात्यावर २२ हजार कोटी रुपये जमा करण्यात आले. याच कार्यक्रमाला फडणवीस यांनी ऑनलाईन हजेरी लावली. या कार्यक्रमानिमित्त त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला. राज्यात राबवण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती शेतकऱ्यांना दिली. पोकराच्या २ टप्प्यासाठी ६ हजार कोटी रुपये दिले असून विदर्भ, मराठवाडा आणि खानदेशातील गावांची निवड यासाठी केली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना लाभ मिळणार असल्याचा दावा फडणवीस यांनी केला. दरम्यान, विधानसभा निवडणुकीच्या पूर्वी पीएम किसान पान २ वर

## स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकिचा फैसला आज ; सर्वोच्च न्यायालयात होणार सुनावणी

नवी दिल्ली । वृतसंस्था

**स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक प्रकरणाची सुनावणी मंगळवार दि.२५ रोजी सर्वोच्च न्यायालयात पार पडणार आहे. यापूर्वी मागील महिन्यात या प्रकरणी सुनावणी पार पडली होती. त्यावेळी न्यायालयाने काही काळ हे प्रकरण ऐकल्यानंतर पुढच्या सुनावणीसाठी २५ फेब्रुवारी ही तारीख निश्चित केली होती. सुनावणीत याबद्दलचा निर्णय झाला तर स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका पुढच्या काही महिन्यांमध्ये लागू शकतील. मात्र निर्णयाला उशीर झाला तर निवडणुका आणखी लांबण्याची शक्यता आहे.**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि त्यामध्ये ओबीसी आरक्षण हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. सर्वोच्च न्यायालयासमोर हे प्रकरण न्यायालयात प्रलंबित



असल्यामुळे राज्यात अनेक ठिकाणी पान २ वर

## सीएम कार्यालयातून भगतसिंग-डॉ.आंबेडकर यांचे फोटो हटवले

### आतिशी यांची भाजपवर टीका, विधानसभेतही गोंधळ

दिल्ली । वृतसंस्था

संविधान निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि शहीद भगतसिंग यांचे फोटो दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांच्या विधानसभेतील कार्यालयातून काढून टाकण्यात आले आहेत असा दावा आम आदमी पार्टीने केला आहे. यातून भाजपचे दलितविरोधी राजकारण उघड होते आहे अशी टीका माजी मुख्यमंत्री आतिशी यांनी केली.

अरविंद केजरीवाल यांच्या दिल्ली सरकारच्या काळात, प्रत्येक सरकारी कार्यालयात आंबेडकर आणि शहीद भगतसिंग यांचे फोटो लावण्यात आले होते. पण जेव्हा आम्ही दिल्लीच्या पान २ वर

## नीलम गोऱ्हे यांनी बोलायला नको होते ; त्या चार वेळा आमदार कशा झाल्या सर्वांना माहित

पुणे । प्रतिनिधी

**ठाकरेंच्या शिवसेनेत दोन मर्सिडीज दिल्या की एक पद मिळायचे, असा खळबळजनक आरोप विधान परिषदेच्या उपसभापती आणि शिंदे गटाच्या नेत्या डॉ. नीलम गोहे यांनी ९८ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनात केला होता. यावर सोमवारी (दि. २४) राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी भाष्य केले. नीलम गोऱ्हे या चारवेळा आमदार कशा झाल्या हे सर्वांना माहित आहे, अनेक पक्षांचा अनुभव घेतलेल्या नीलम गोऱ्हेंनी, असे विधान करायला नको होते, असा टोला पवारांनी लगावला.**



नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत बोलताना शरद पवार म्हणाले की, ठाकरेंच्या शिवसेनेत दोन मर्सिडीज दिल्या की एक पद मिळायचे, असे विधान अनेक पक्षांचा अनुभव घेतलेल्या पान २ वर

## पंकजा मुंडे महाकुंभमेळ्यात सहभागी ; आई प्रज्ञाताईंसह त्रिवेणी संगमात केले पवित्र स्नान

मुंबई । प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे आज (ता. २४) प्रयागराजमधील महाकुंभमेळ्यात पोहोचल्या. यावेळी त्यांनी आई प्रज्ञाताई मुंडे यांच्यासह त्रिवेणी संगमात पवित्र स्नान केले.

प्रयागराज येथील घाटावर जाऊन त्यांनी संगमात आस्थेची पवित्र डुबकी घेतली. प्रयागराजमधील कुंभमेळ्यात ना. पंकजाताई व यांनी आई प्रज्ञाताई मुंडे यांच्यासह त्रिवेणीच्या संगमात पवित्र स्नान केले. तसेच त्यांनी यावेळी त्रिवेणी संगम येथे आरती आणि प्रार्थना देखील केली.



**अद्भुत अन् अद्वितीय अनुभव – ना. पंकजाताई**

यावेळी माध्यमांशी बोलतांना ना. पंकजाताई म्हणाल्या, पान २ वर

## मस्साजोगचे ग्रामस्थ करणार अन्न त्याग आंदोलन, काँग्रेस काढणार सद्भावना यात्रा

बीड । प्रतिनिधी

**उज्वल निकम यांची सरकारी वकील म्हणून नियुक्ती, पोलीस उप अधीक्षकांसह काही पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या आणि कृष्णा आंधळेच्या अटक यासह एकूण ८ ते ९ मागण्यांसाठी मस्साजोगचे ग्रामस्थ आता अन्न त्याग आंदोलन करणार आहेत. त्याचबरोबर काँग्रेसच्या वतीने मस्साजोग ते बीड अशी सद्भावना यात्रा काढली जाणार आहे.**

या आंदोलनाबद्दल बोलताना धनंजय देशमुख म्हणाले, गावकऱ्यांनी बैठक घेतली होती. त्यात सर्वानुमते अन्नत्याग आंदोलनाचा निर्णय घेतलेला आहे. त्यात ८ ते ९ मागण्या आहेत. उज्वल निकमांची सरकारी वकील म्हणून नियुक्ती, कृष्णा आंधळेला अटक कधी करणार, अशा मागण्या आहेत. त्या आंदोलनात मी सुद्धा सहभागी असणार आहे. गावकऱ्यांचे शिष्टमंडळ बीड पोलीस अधीक्षकांची भेट घेणार आहे. पान २ वर

### काँग्रेस काढणार यात्रा

काँग्रेसचे नवनियुक्ती प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने धनंजय देशमुख यांची भेट घेतली. मस्साजोग ते बीड यात्रा काढणार असल्याचे त्यांनी धनंजय देशमुख यांना सांगितले. याबद्दल बोलताना धनंजय देशमुख म्हणाले, ते आले. आमचे सांत्वन केले. विचारणा केली की, आमची एक संकल्पना आहे. त्या संकल्पनेवर तुमचे मत काय आहे. आम्हाला सात्वंनेसाठी कोण आले हे बघितले नाही, बघणार नाही. त्यांनी गावकऱ्यांसोबत चर्चा करून सद्भावना यात्रेबद्दल कळवू. यात न्यायाची भूमिका घेण्याबद्दल आम्ही त्यांना मागणी करणार आहोत.

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२२ फेब्रुवारी २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १३०.०० क्विंटल | २,८०२ | ३,३५८ | ३,२११ |
| ज्वारी/हायब्रिड: १३६.००क्विंटल | १,८०० | ३,६५० | २,४०४ |
| मका/लोकल:५.०० क्विंटल | २,२०१ | २,२०१ | २,२०१ |
| तूर : ४३.५० क्विंटल | ७,००१ | ७,३८१ | ७,१७१ |
| उडीद : ७.५० क्विंटल | ५,१०० | ५,१०० | ५,१०० |
| बाजरी: ११.०० क्विंटल | २,३०० | ३,३०४ | २,८४३ |
| मुग :४.५० क्विंटल | ६,५०१ | ७,४५१ | ६,९७६ |
| सोयाबीन: ७.०० क्विंटल | ३,६०० | ४,००० | ३,८४३ |
| हरभरा:५.५० क्विंटल | ५,२६० | ५,३०० | ५,२८० |

# बीडच्या नवीन पाणीपुरवठा योजनेला वीज कनेक्शन देण्याचा मार्ग मोकळा


## अखेर आ.संदीप क्षीरसागर, माजी आ.सय्यद सलीम यांच्या अनेक वर्षांच्या पाठपुराव्याला यश

### ना.अजितदादा पवारांचे मानले आ.क्षीरसागरांनी आभार

बीड । प्रतिनिधी

बीड शहरासाठी जिव्हाळ्याचा असलेला पाणी प्रश्न आणि त्यावर तोडगा काढण्यासाठी आ.संदीप क्षीरसागर, माजी आ.सय्यद सलीम यांचा सर्व स्तरांवर अनेक वर्षांपासून सुरू असलेला अखंडित पाठपुरावा आणि अथक परिश्रम यांना अखेर आता यश आले आहे. ना.अजितदादा पवार यांच्याकडे याबाबत आ.संदीप क्षीरसागरांनी न्याय मागितला आणि तो ना.अजितदादांनी दिला. बीडच्या नवीन पाणीपुरवठा योजनेला नवीन





वीज कनेक्शन देण्यासाठी आणि थकीत वीजबील भरण करण्यासाठी जिल्हा नियोजन विकास निधीतून तरतूद करा. असे निर्देश नगरविकास विभागाचे प्रधान सचिव यांनी जिल्हाधिकारी व बीड नगरपालिकेचे



मुख्याधिकारी यांना दिले आहेत.

बीडला सध्या कार्यरत असलेली पाणीपुरवठा योजना खूप जुनी आहे. त्यावर बीड शहराचा वाढलेला विस्तार आणि लोकसंख्या यांमुळे या सध्या कार्यरत असलेल्या योजनेतून होणारा पाणीपुरवठा हा बीड शहराच्या आवश्यकतेपेक्षा अतिशय कमी आणि अपूरा होत आहे. परंतु त्यामध्ये महत्वाची गोष्ट अशी की सध्याच्या आणि भविष्यातील बीड शहराच्या पाण्याच्या आवश्यक त्या क्षमतेची 'अटल अमृत पाणीपुरवठा योजना' संपूर्ण काम पूर्ण होऊन तयार आहे. परंतु त्यामध्ये केवळ एकच बाब अडचणीची आणि अडसर ठरली, ती म्हणजे बीड नगरपालिकेकडे महावितरण विभागाची एकूण ४१ कोटी ७५ लाख रूपयांची वीजबिल थकबाकी आहे. आणि पहिलीच थकबाकी असल्याने नवीन योजनेला नव्याने वीज कनेक्शन महावितरण विभागाकडून दिले जात नव्हते. त्यामुळे आवश्यक्तेपेक्षा अतिशय कमी क्षमता असलेल्या जुन्या पाणीपुरवठा योजनेतूनच बीड शहराला अनियमित पाणीपुरवठा सद्यस्थितीत केला जात आहे. परिणामी, बीड शहराचे पाणीस्त्रोत असलेल्या माजलगाव बॅकवॉटर आणि बिंदुसरा धरणात मुबलक पाणीसाठा उपलब्ध असताना देखील बीड शहरात २०–२० दिवसातून एकदा पाणी मिळत आहे. यावर पान २ वर

## अग्रलेख

# अळी मिळी गुप चिळी देशासाठी घातक !

जॉन एफ केनेडी राष्ट्रपती असताना त्यांचे विश्वासू आणि जागतिक कीर्तीचे अर्थतज्ञ जॉन केनेथ गालब्रेथ हे अमेरिकेचे भारतातील राजदूत होते. त्यांनी तेव्हा भारतातील लोकशाहीला 'फंक्शनिंग अनार्की' (चालणारी बेबंदशाही) असे संबोधले होते. आज ज्या प्रकारे घटना घडत आहेत आणि त्यावर सत्ताधाऱ्यांच्या ज्या प्रतिक्रिया येत आहेत त्यावरून असेच काहीसे देशात सुरु आहे असे वाटावे. नवी दिल्लीतील घटनेत ८-१० मुलेदेखील पायदळी तुडवली गेल्याने ही घटना म्हणजे नरसंहार आहे असे विरोधी पक्ष म्हणू लागले आहेत. रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांचा राजीनामा विरोधकांनी अशा परिस्थितीत मागितला नसता तरच नवल होते. अशा पद्धतीने अडचणीत येण्याची वैष्णव यांची ही पहिलीच वेळ नाही.


८-१० दिवसांपूर्वी प्रयागराज येथील महाकुंभमध्ये घडलेल्या महाचेंगराचेंगरीत हजारो लोक मृत्युमुखी पडले असे आरोप संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात करण्यात आले. अजूनही हजारो लोक आपल्या नातेवाईकांचा पत्ता लागण्याकरता तिथे इकडून तिकडे भटकत आहेत. कोणाला बेपत्ता झालेल्या नातेवाईकांचे मृत्यूचे सर्टिफिकेट हवे आहे अशा घटना दिसत आहेत. त्याकडे कानाडोळा केला जात आहे. या चेंगराचेंगरीनंतर दिवसभर पोलीसांनी फारशी काही माहिती बाहेर येऊ दिली नाही आणि प्रेतांची परस्पर विल्हेवाट लावली असे दावेदेखील झाले आहेत. उत्तर प्रदेशमधील पुढील विधानसभा निवडणूक दोन वर्षावर आहे आणि तेव्हा जगातील सर्वात मोठ्या धार्मिक प्रसंगाचे आपण किती शिस्तबद्ध आयोजन केले याची टिमकी वाजवत ती निवडणूक जिंकायचा सत्ताधाऱ्यांचा बेत आहे. म्हणूनच अळी मिळी गुप चिळी पाळली जात आहे. भारताला खरोखरच 'विकसित' देश व्हायचे असेल तर प्रत्येक जीवाची किंमत जाणली गेली पाहिजे. माणसे किडा-मुंगीप्रमाणे मेली तर तो विकसित देश कसला? असा प्रश्न जाणकार विचारू लागले आहेत. दिल्लीत राजकारण अजून थांबलेले नाही. आम आदमी पक्षाची सत्ता गेली आता भाजपने त्या पक्षाला महानगरपालिकेमध्ये खाली खेचावयाचे ठरवलेले दिसत आहे. अरविंद केजरीवाल यांचा पक्ष हरल्यावर एक आठवडा उलटायच्या आत त्यांच्या आपचे तीन कौन्सीलर हे भाजपला येऊन मिळाले आहेत. आता भाजप आणि आपच्या सदस्यांची संख्या प्रत्येकी ११५ झाली आहे. चंदीगड महापौरपदाच्या निवडणुकीत काँग्रेस आणि आपने युती करून देखील भाजप त्यांच्यात खिंडार पाडण्यात यशस्वी ठरली.

मुख्य निवडणूक आयुक्ताच्या निवडीवरून सुरु झालेला वाद दिवसेंदिवस जास्त गडद होऊ शकतो. राहुल गांधी यांनी विरोधी पक्ष नेता या नात्याने या 'मध्यरात्रीच्या निर्णयाविरुद्ध' दिलेले मत हे सरकारला अडचणीचे ठरू शकते. सर्वोच्च न्यायालयाने यासंबंधीच्या याचिकांची सुनावणी पुढे ढकलली असली तरी हा वाद अजिबात संपलेला नाही. काँग्रेस सोडून इतर विरोधी पक्षांनी याबाबत अजून फारसा आवाज उठवला नसला तरी त्यांना आज ना उद्या याबाबत भूमिका घेणे भाग पडेल. नुकतेच निवृत्त झालेले राजीव कुमार यांच्या कारभाराबाबत विरोधी पक्षात सर्वदूर नाराजी होती. निवडणुकीनंतर महाराष्ट्रात तिच्या निष्पक्षतेबाबत जे प्रश्न विचारले गेले ते बहुधा अनुत्तरित राहिले वा त्याने विरोधकांचे समाधान झाले नाही. ज्या पद्धतीने अमेरिकेत बेकायदेशीरपणे राहणाऱ्या भारतीयांची अमानुषपणे हकालपट्टी सुरु झाली आहे आणि पंतप्रधानांच्या अमेरिका दौऱ्यानंतरही त्यात बदल आलेला नसल्याने सरकारकरता तो दिवसेंदिवस एक अडचणीचा मुद्दा बनत चालला आहे. अमेरिकन लष्कराची ही विमाने पंजाबमध्येच का उतरत आहेत याचा तेथील आम आदमी पक्षाने निषेध केलेला आहे. त्यातच भारतीय निवडणूकात अमेरिकन सरकारी संस्थेने केलेल्या ढवळाढवळीबाबत डोनाल्ड ट्रम्प यांनी केलेले विधान एक नवे वादळ माजवत आहे. अमेरिकेच्या व्यापाराबाबतच्या अतिरेकी निर्णयांमुळे भारतीय बाजार कोसळू लागला आहे. आणि ज्याप्रकारे ट्रम्प हे एकामागून एक बेदरकार निर्णय घेत सुटले आहेत त्याने भारताला अजूनदेखील बरेच दणके बसणार आहेत, असा जाणकारांचा कयास आहे.

## माणिकराव कोकाटेंना तात्पुरता दिलासा : शिक्षेला स्थगिती, आमदारकीवरील टांगती तलवार कायम

**नाशिक । वृत्तसंस्था**

**कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांना तात्पुरता दिलासा मिळाला आहे. अतिरिक्त जिल्हा न्यायालयाने दिलेल्या शिक्षेला तात्पुरती स्थगिती देण्यात आली आहे. सुनावणी संपेपर्यंत कोकाटे यांना १ लाख रुपयांचा जामीन न्यायमूर्ती नितीन जीवने यांनी सोमवारी (दि.२४) मंजूर केला आहे.**



माजी मंत्री तुकाराम दिघोळे यांचे जावई वकील आशुतोष राठोड यांनी घेतलेला आक्षेपही न्यायालयाने फेटाळला. पण माणिकराव कोकाटे यांच्या आमदारकीवरील टांगती तलवार कायम आहे. मागील आठवड्यात कोकाटे यांना २ वर्षांची शिक्षा आणि ५० हजारांचा दंड अशी शिक्षा ठोठावली होती. माजी मंत्री तुकाराम दिघोळे हे साक्षीदार आणि तक्रारदार नव्हते. त्यामुळे जावई आशुतोष राठोड यांना न्यायालयाने फटकारले. मंगळवारी सरकारी पक्षाचे वकील बाजू मांडणार आणि मग अंतिम निर्णय होणार आहे. या प्रकरणाची सुनावणी संपेपर्यंत कोकाटे यांना १ लाख रुपयांचा जामीन मंजूर झाला आहे. आमदारकी रद्दबाबत सुनावणी संपेपर्यंत न्यायालयाच्या शिक्षेला स्थगिती देण्यात आली आहे. १९९५ ते ९७ मध्ये सरकारच्या १० टक्के कोट्यातून घर घेतल्याचा त्यांच्यावर आरोप होता. याप्रकरणी माणिकराव कोकाटे यांच्यासह त्यांच्या भावावर गुन्हा दाखल केला होता. या प्रकरणात तत्कालीन मंत्री तुकाराम दिघोळे यांनी न्यायालयात याचिका दाखल केली होती. या खटल्याचा निकाल तब्बल २९ वर्षांनी लागला असून, न्यायालयाने माणिकराव कोकाटे आणि त्यांच्या भावास २ वर्षांचा कारावास आणि ५० हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे.

## प्रभावती काळे

**माजलगाव । प्रतिनिधी**

**शहरापासून जवळच असलेल्या समर्थनगर (चिंचगव्हाण) येथील रहिवासी सौ. प्रभावती रामचंद्र काळे वय ७६ वर्ष यांचे अल्पशा आजाराने दि.२४ फेब्रुवारी सोमवारी निधन झाले.**



**त्यांच्या पार्थिवावर मंगलनाथ स्मशानभूमीत आज दि.२५ फेब्रुवारी मंगळवार रोजी सकाळी ९:३० वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात पती, चार मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. वीज सहकारी पतसंस्थेचे कर्मचारी दत्तात्रय काळे, प्रा. संजय काळे, गणेश काळे, विजय काळे यांच्या त्या मातोश्री होत.**

## संभाजी ब्रिगेड कळंबचा वतीने राष्ट्रसंत गाडगेबाबा महाराज जयंती साजरी

**कळंब । प्रतिनिधी**

**सकल मराठा समाज व संभाजी ब्रिगेड चा वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौक कळंब येथे राष्ट्रसंत गाडगे महाराज प्रतिमेचे पूजन करून जयंती साजरी करण्यात आली . संभाजी ब्रिगेड चे प्रदेश संघटक शिवकीर्तनकार डॉ. बालाजी जाधव सर यांचा शिवधर्म दिनदर्शिका पुस्तकं देऊन सत्कार करण्यात आला.**

या वेळी संभाजी ब्रिगेड चे प्रदेश संघटक अतुल गायकवाड जिल्हा अध्यक्ष ऍड तानाजी चौधरी, बाबुराव शेंडगे,ऍड. अशोक चोंदे,शिवानंद ढेंगळे,प्रशांत लोमटे, शीतल चोंदे,भूषण करंजकर, सचिन सुलाखे,संभाजी हारकर, विशाल पांचाळ आदी उपस्थित होते.




## वाघोरा येथे शिवजन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा

### जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**माजलगाव। पतिनिधी**

**तालुक्यातील वाघोरा येथे मोठ्या उत्साहात शिवजन्मोत्सव साजरा करण्यात आला. पहाटपासून प्रत्येक घरासमोर सडा रांगोळी काढून लहान बालके, तरुण, स्त्री-पुरुष, वयोवृद्ध सुद्धा मोठ्या उत्साहात होते. राजमाता जिजाऊ मासाहेब, छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासह अनेक मावळे यांच्या वेशभूषा साकारलेले विद्यार्थी पण तयार होऊन श्रीराम प्रभूच्या मंदिरासमोर सकाळी आठ वाजता शिवरायांच्या पालखीसह मिरवणुकीला सुरुवात झाली.**



सर्वात समोर ढोल ताशांचा गजर होता शिवरायांची पालखी वेशभूषा साकारलेले छत्रपती शिवाजी महाराज व स्वराज्यजननी राजमाता जिजाऊ मासाहेब घोड्यावर होत्या. मावळ्यांच्या वेशभूषेत विद्यार्थी ''शिवबा राजा बसला घोड्यावरी'' या गीतावर लेझीम सादर करत होते. माता पालक, गावकरी, विद्यार्थी सोबत तुमचं आमचं नातं काय? जय जिजाऊ! जय शिवराय! अशा घोषणा देत गावातून मिरवणूक काढण्यात आली. शाळेमध्ये आल्यानंतर मान्यवरांच्या हस्ते शिवरायांचे प्रतिमा पूजन करून अभिवादन करण्यात आले. विद्यार्थ्यांचे वेगवेगळ्या गीतावर नृत्य, पोवाडे, गीत, शिवरायांविषयी विविध पुस्तकांचे वाचन, गड किल्ल्याचे चित्र, भाषणे झाली. गावकऱ्यांनी रात्री प्रत्येक घरावर दिव्याच्या प्रकाशाची रोषणाई सह विविध कार्यक्रम मोठ्या उत्साहात केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शरद कुलकर्णी तर सूत्रसंचालन बबन पोटे विद्यार्थ्यांना नृत्य, वेशभूषा, शृंगार मार्गदर्शन केशव बादाडे यांनी केले. कार्यक्रमास विशेष सहकार्य वेशभूषा साहित्य वाघेश्वर प्रतिष्ठान यांनी केले. श्रीराम बादाडे, अरुण बादाडे, लखन बादाडे, गणेश बादाडे, रामेश्वर बादाडे, किशोर बादाडे, सचिन बादाडे, गोवर्धन महाराज बादाडे यांच्यासह अनेकांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमास विद्यार्थी, गावकरी, माता पालक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी ॲड.विनायक जाधव तर उपाध्यक्षपदी प्रकाश काशिद





### संघटनेत ग्रामीण भागातील पत्रकारांना जिल्हा स्तरावरील सन्मानाची पदे

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेश संपर्क प्रमुख वैभव स्वामी यांनी एक नवीन पायंडा सुरू केला आहे. पत्रकार संघटनेच्या जिल्हा कार्यकारिणीमध्ये ग्रामीण भागातील वडवणी, माजलगाव, धारूर तालुक्यातील पत्रकार यांना जिल्हास्तरावर काम करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. याबद्दल नुतन कार्यकारणीच्या वतीने स्वामी सर यांचे आभार मानले आहेत.

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई अंतर्गत बीड जिल्ह्याच्या ग्रामीण बीड जिल्हाध्यक्षपदी ॲड.विनायकराव जाधव यांची तर उपाध्यक्षपदी दिंद्रुड येथील ज्येष्ठ पत्रकार प्रकाशराव काशिद यांची निवड करण्यात आली आहे. सोमेश्वर सोनटक्के, बालासाहेब फपाळ , किसनराव भदरगे यांचीही निवड जाहीर करण्यात आली आहे. या निवडीचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे.**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे संस्थापक संजयजी भोकरे साहेब यांच्या आदेशानुसार तर सरचिटणीस विश्वासराव आरोटे साहेब, प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे सर यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रदेश संपर्क प्रमुख वैभव स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली १८ फेब्रुवारी रोजी तेलगाव येथे सायंकाळी ४ वाजता माजलगाव, धारूर, वडवणी कार्यक्षेत्रातील पत्रकारांची निवडी संदर्भात व्यापक बैठक झाली. या बैठकीमध्ये या कार्यक्षेत्रासाठी बीड जिल्हा ग्रामीण यांच्या निवडी सर्वानुमते खेळीमेळीच्या वातावरणात जाहीर करण्यात आल्या.या बैठकीमध्ये महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई संघटनेच्या वाढीसाठी चर्चा,विचार- विनिमय करून आगामी काळात संघटनेचे ध्येय-धोरणे ठरविण्यात आले. यावेळी माजलगाव येथील पत्रकार सुदर्शन स्वामी, सुहास बोराडे, सय्यद आखिल, अँड.मस्के, सतिष राव मुजमुले, शंकर झाडे, शंकर जाधव,शेख एजाज, अर्जुन मुंडे, विष्णु डोईफोडे यासह माजलगाव, धारूर, वडवणी तालुक्यातील महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे पदाधिकारी, सदस्य,पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. नुतन निवड झालेल्या बीड जिल्हा पदाधिकारी यांचा सत्कार करून अभिनंदन करण्यात आले आहे.

## महाशिवरात्री निमित्त पिंपळेश्वर देवस्थानच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन

### ● आ.सुरेश धस यांच्या हस्ते आज रात्री महाभिषेक

**आष्टी । प्रतिनिधी**

**सालाबादप्रमाणे याही वर्षी आष्टी शहरातील पिंपळेश्वर महादेव मंदिराच्या प्रांगणात महाशिवरात्री निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून.आज मध्यरात्री देवस्थानाच्या वतीने आ.सुरेश धस यांच्या हस्ते महाभिषेक केला जाणार असल्याची माहिती देवस्थान समितीच्या वतीने देण्यात आली आहे.**

आष्टी तालुक्यासह राज्यातील कानाकोपऱ्यातून महाशिवरात्री निमित्त शहरातील पिंपळेश्वर मंदिरामध्ये महादेवाच्या दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविकांची रीघ लागते.महाशिवरात्रीच्या पूर्वसंध्येला म्हणजेच मध्यरात्री याठिकाणी महादेवाला महाभिषेक घालण्यात येणार असून आ.सुरेश धस यांच्या हस्ते हा महाभिषेक केला जाणार आहे.बुधवारी पहाटे ४ ते ७ यावेळेत सार्वजनिक अभिषेक पार पडल्यानंतर सकाळी ७ वाजल्यापासून मंदिर भाविकांच्या दर्शनासाठी खुले करण्यात येणार आहे.दिवसभर दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी उपवासाच्या निमित्ताने महाप्रसादाचे देखील आयोजन करण्यात आले आहे.शिवाय या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर यात्रा देखील या दिवशीच भरते.सायंकाळी ७ वाजता महाआरती संपन्न झाल्यानंतर मंदिरावर आकर्षक फटाक्यांची आतषबाजी केली जाणार आहे.गुरुवार दि.२७ रोजी दुपारी शहरातून पारंपरिक वाद्यासह पिंपळेश्वर महादेवाच्या प्रतिमेची भव्य शोभा यात्रा संपन्न होणार असून या सर्व कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन मंदिर समितीच्या वतीने करण्यात आले आहे.



## पान १वरून...

### पीएम किसान योजनेचा १९ वा

आतापर्यंत सुमारे साडेतीन लाख कोटी रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात पोहोचले आहेत. हे माझ्यासाठी खूप समाधान आणि अभिमानाची गोष्ट आहे. आमचा हा प्रयत्न अन्नदात्यांसाठी आदर, समृद्धी आणि नवीन शक्ती देत आहे, असे ते म्हणाले.

---------------

### राज्यातील शेतकऱ्यांच्या

आज देखील दिले जात नाही. सरकारकडे पैसेच नसल्याचे कृषिमंत्री खात्याचे म्हणणे आहे. असे असेल तर त्या वेळेचे कृषी मंत्री आणि कृषी खात्याचे सचिव यांनी ही योजना निवडणुकीपूर्वी राबवली का ? हा प्रश्नही उपस्थित होत आहे. मोठ्या प्रमाणात ओरड झाल्यानंतर आता सरकारने जानेवारी २०२५ मध्ये दोनशे कोटी रुपये तर फेब्रुवारी महिन्यात १५३ कोटी रुपयांचा निधी कृषी खात्याला वर्ग केला आहे. मात्र या निधीने शेतकऱ्यांचे देणे पूर्ण होत नाही. त्यामुळे नियोजन शून्य कारभार आणि निवडणुका डोळ्यापुढे ठेवून वाटलेली खैरात, अशीच ही योजना ठरल्याचा आरोपही देशमुख यांनी केला आहे. तर दुसरीकडे गांभीर्याने विचार केला तर राज्य शासनाच्या कृषी खात्याच्या धोरणात सातत्य नसल्यामुळे सिंचन व्यवस्था कोलमडली आहे. फळ पिकांची सिंचन व्यवस्था देखील भ्रष्टाचारात बुडालेली आहे. एकूणच कृषी खात्यावर सरकारचे नियंत्रण नसल्याने लाभार्थ्यांमध्ये देखील दलाल घुसले असून दलालांनी देखील अनेकांना लुटल्याचे समोर येत आहे. सरकारने आता या योजनेची चौकशी करावी आणि दोषींवर कारवाई करावी, असेही ॲड. अजित एम. देशमुख यांनी म्हटले आहे.

--------------

### शेतकऱ्यांना आता वार्षीक

आणि नमो शेतकरी सन्मान निधी योजनेचा हप्ता १५ हजार रुपये करण्याचे आश्वासन भाजपने जाहीरनाम्यात दिले होते. परंतु निवडणुकीनंतर त्यावर मौन बाळगण्यात आले. आता मात्र देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांना पीएम किसान ६ आणि नमोचे ६ हजार अशी एकूण १२ हजारांमध्ये ३ हजारांची भर घालण्याची घोषणा केली आहे.

------------

### नीलम गोऱ्हे यांनी बोलायला नको होते ; त्य

गाऱ्हेंनी असे विधान करायला नको होते. नीलम गोऱ्हे या चारवेळा आमदार कशा झाल्या हे सर्वांना माहित आहे. नीलम गोऱ्हे यांच्याबाबत संजय राऊत जे बोलले ते १०० टक्के योग्य होते. ते नेहमीच योग्यच बोलतात. मी स्वागताध्यक्ष असल्याने राउतांना माझ्यावर जबाबदारी टाकायची असेल, असेही शरद पवार म्हणाले. साहित्य संमेलन राजकारण्यांनी हायजॅक केले हा आरोप मला मान्य नाही, असे सांगत दिल्लीतील साहित्य संमेलनात देशभरातून गर्दी झाली. साहित्य संमेलन म्हटले की वाद हे आलेच, असेही पवार म्हणाले.

**नीलम गोऱ्हे यांच्याविरोधात अब्रु नुकसानीचा दावा करणार - सुषमा अंधारे**

एकेकाळच्या शिवसेना पक्षाच्या महिला उपनेत्या तथा विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी शिवसेना उबाठा पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर गंभीर आरोप केला. त्या आरोपावरून नीलम गोऱ्हे यांच्यावर सुषमा अंधारे यांनी नीलम गोऱ्हे यांच्या विरोधात अब्रु नुकसानीचा दावा दाखल करणार असल्याचा इशारा सोमवारी प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलताना दिला. त्याविषयीची कागदपत्रे आमच्या लीगल टीमकडून तयार करण्यात येत आहेत. वास्तविक पाहता नीलम गोऱ्हे यांच्याकडे बक्कळ पैसा आहे, पण त्या शिवसेनेचे देणे लागतात. त्यामुळे त्यांनी केलेले आरोप एकतर सिद्ध करावेत अन्यथा नाक घासून माफी मागावी असा इशाराही यावेळी दिला.

---------

### सीएम कार्यालयातून भगतसिंग-

मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांना त्यांच्या विधानसभेतील कार्यालयात भेटायला गेलो तेव्हा आम्हाला दिसले की दोन्ही फोटो मुख्यमंत्री कार्यालयातून काढून टाकण्यात आले आहेत, आम आदमी पक्ष याचा तीव्र विरोध करतो असे आतिशी यांनी म्हटले आहे. मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयात आता पंतप्रधान नरेंद्र मोदी, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि महात्मा गांधी यांचे फोटो आहेत असा दावा आपने केला आहे. दिल्लीचे माजी मुख्यमंत्री आणि आम आदमी पक्षाचे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल यांनीही फोटो हटवल्याबद्दल नाराजी व्यक्त केली आहे. ते म्हणाले, दिल्लीतील नवीन भाजप सरकारने बाबासाहेबांचा फोटो काढून टाकला आणि त्याऐवजी पंतप्रधान मोदींचा फोटो लावला हे बरोबर नाही. यामुळे बाबासाहेबांच्या कोट्यवधी अनुयायांना दु:ख झाले आहे. माझी भाजपला एक विनंती आहे. तुम्ही पंतप्रधानांचा फोटो लावू शकता पण बाबासाहेबांचा फोटो काढू नका. या छायाचित्रांवरूनदिल्ली विधानसभेतही मोठा गोंधळ झाला. नवीन सभापती विजेंद्र गुप्ता यांचे अभिनंदन करताना आतिशी म्हणाल्या की, छायाचित्रे काढून टाकणे अपमानास्पद आहे. यावर आपचे आमदारही गोंधळ घालताना दिसले. यावर सभापती विजेंद्र गुप्ता म्हणाले की, हे एक सौजन्यपूर्ण भाषण होते. राजकीय व्यासपीठ तयार करायला नको होते. मी आतिशींच्या वर्तनाचा तीव्र निषेध करतो.

-------------

### स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकिचा

चार- चार वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झालेल्या नाही. देशात लोकसभेपाठोपाठ राज्यात विधानसभा निवडणूक झाली. त्यानंतर राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कधी होतील, यावर सर्वत्र चर्चा सुरू आहे. मागील सुनावणीत न्यायालयाने राज्य सरकार आणि याचिकाकर्त्यांना स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ओबीसी आरक्षणासंदर्भात काय झाले, याबद्दल विचारणा केली होती. त्यावर दोन्ही बाजूंकडून याबाबत स्पष्टता आल्याचे सांगण्यात आले होते. राज्य सरकारने आपली बाजू मांडण्यासाठी १ तास तर याचिकाकर्त्यांनी अर्ध्या तासाचा वेळ मागितला होता. आजच्या सुनावणीत या संदर्भातले युक्तिवाद पूर्ण झाले तर हा विषय मार्गी लागून येऊन निवडणुका एप्रिल- मे मध्ये होण्याची शक्यता आहे. मात्र सुनावणीत हा विषय पूर्ण होऊ शकला नाही तर या प्रक्रियेला आणखी वेळ लागू शकतो. त्यामुळे निवडणुका आणखी लांबू शकतात. विधानसभा निवडणुकीनंतर सर्वच राजकीय पक्षांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे वेध लागले आहेत. तशी मोर्चेबांधणी विविध पक्षांकडून सुरु झाली आहे. मात्र यासाठी त्यांना आणखी काही काळ वाट पाहावी लागणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ओबीसी आरक्षणाचा मुद्दा रखडल्याने राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात याचिका केली होती. या याचिकेच्या माध्यमातून निवडणुका घेण्यासंदर्भात विनंती न्यायालयाकडे करण्यात आली. तर ओबीसी आरक्षण असो किंवा नसो मात्र निवडणुका व्हाव्यात, अशी मागणी याचिकाकर्त्यांनी केली आहे.

-------------

### मस्साजोगचे ग्रामस्थ करणार अन्न त्याग

त्यात मी सुद्धा असणार आहे. या मागण्यांसंदर्भात त्यांच्यासोबत चर्चा करू'', अशी माहिती धनंजय मुंडे यांनी दिली. या अन्नत्याग आंदोलनात गावकरी साखळी पद्धतीने सहभागी होतील. या ठिकाणी जितक्या लोकांची व्यवस्था असेल, तितके लोक पहिल्या दिवशी इथे बसतील. त्यात पुरुष महिला असतील. याचे नियोजन संध्याकाळी गावकरी करणार आहेत'', असे धनंजय देशमुख यांनी सांगितले.

-------------

### पंकजा मुंडे महाकुंभमेळ्यात सहभागी ; आई

महाकुंभमेळ्यातील पवित्र स्नानाचा आणि इथल्या वातावरणाचा अद्भुत आणि अद्वितीय असा अनुभव मला आला. २०२७ मध्ये नाशिक येथे होणाऱ्या महाकुंभमेळ्याची तयारी कशी करता येईल याचा अभ्यास आम्ही इथे केला. एवढी प्रचंड गर्दी असूनही प्रयागराजमधील महाकुंभमेळ्याची व्यवस्था अतिशय चोख आणि नियोजनबद्ध आहे त्याबद्दल मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ व त्यांच्या टीमचे त्यांनी मनापासून कौतूक केले. खरचं, मन भारावून गेले.. हा महाकुंभ यशस्वी करण्यासाठी चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांपासून ते कॅबिनेट मंत्र्यांपर्यंत सर्व जण खूप परिश्रम घेत आहेत याबद्दल त्यांचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे अशा शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

**उत्तरप्रदेशच्या पर्यावरण विभागाच्या अधिकाऱ्यांशी केली चर्चा**

ना. पंकजाताई मुंडे यांनी उत्तरप्रदेशमधील पर्यावरण आणि प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांसमवेत देखील या दौऱ्यात चर्चा करून इथल्या पर्यावरण विषयक बाबींचा अभ्यास केला. नाशिक येथे होणाऱ्या महाकुंभमेळ्यात याचा कसा उपयोग करून घेता येईल याचीही माहिती त्यांनी घेतली.

-------------

### बीडच्या नवीन पाणीपुरवठा योजनेला

आ.संदीप क्षीरसागर व माजी आ.सय्यद सलीम यांनी शहरातील नागरिकांचे पाण्यावाचून होणारे हाल पाहता शासन, प्रशासन स्तरावर पाठपुरावा सुरू केला. आ.संदीप क्षीरसागर यांनी तर जवळपास प्रत्येक च अधिवेशनात, जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत हा प्रश्न मांडला. शासनस्तरावर पाठपुरावा करून अनेकवेळा हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी मागणी लावून धरली, वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांकडे अनेकवेळा बैठका घेतल्या. शेवटी काही तोडगा निघत नसल्याने आ.संदीप क्षीरसागर यांनी उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याबाबत जनहित याचिका क्र.२१/२०२४ दाखल केली. त्यानंतर ना.अजित दादा पवार बीड जिल्ह्याचे पालकमंत्री झाल्यापासून दोनवेळा यासंदर्भात आ.संदीप क्षीरसागर व माजी आ.सय्यद सलीम यांनी ना.अजितदादांची भेट घेऊन याबाबत त्यांच्याकडे न्याय मागितला. त्यावर ना.अजितदादांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना यासंदर्भात तोडगा काढण्याचे तातडीने निर्देश दिले होते. त्यानुसार याविषयी नगरविकास विभागाचे प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली व संबंधित विभागांचे सचिव आणि वरिष्ठ अधिकारी यांच्या उपस्थितीत मंत्रालयात बैठक झाली. या बैठकीत नगरविकास विभागाचे प्रधान सचिव यांच्याकडून, नगरपालिकेकडे असलेलली थकित वीजबिलाची एकूण रक्कम ४१ कोटी ७५ लाख रुपयांचे ३० टक्के म्हणजेच १२ कोटी रूपये अगोदर भरून वीज कनेक्शन जोडावे व उर्वरित रक्कम टप्प्याटप्प्याने भरण्यात यावी, याकरिता जिल्हा नियोजन विकास निधीतून तरतूद करावी असे निर्देश जिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहेत. त्यामुळे आ.संदीप क्षीरसागर व माजी आ.सय्यद सलीम यांच्या पाठपुरावा आणि निरंतर केलेल्या प्रयत्नांतून बीड शहराचा जिव्हाळ्याचा प्रश्न सुटणार आहे.

## गुरुवारी संत मदन महाराज संस्थानचे अध्यक्ष ह.भ.प.बबन महाराज बहिरवाल यांचे काल्याचे कीर्तन

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील कडा महेश मंदिरात महाशिवरात्री निमित्त भागवत कथा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे .

कडा येथील महेश मंदिरात महाशिवरात्रीनिमित्त दरवर्षी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.यावर्षी देखील गुरुवार दि.२० फेब्रुवारीपासून या सप्ताहास सुरुवात झाली आहे.आळंदी येथील भागवताचार्य ह.भ.प.अशोक महाराज भोसले हे दररोज सायंकाळी ६ ते ९ या वेळेत भागवत कथा सांगत आहेत . त्याशिवाय दैनंदिन कार्यक्रमात काकडा भजन,विष्णु सहस्रनाम, शिवलीलामृत ग्रंथ पारायण, श्रीराम कथा हरिपाठ आणि जागर आदि विविध कार्यक्रम पार पडत आहेत.गुरुवार दि.२७ फेब्रुवारी रोजी मदन महाराज संस्थानचे अध्यक्ष ह.भ.प.बबन महाराज बहिरवाल यांच्या काल्याच्या कीर्तनाने आणि नंतर महाप्रसादाने या सप्ताहाची सांगता होणार आहे. माजी सरपंच श्रीरंग कर्डिले महाप्रसादाचे यजमान आहेत.


# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

मंगळवार, दि. २५ फेब्रुवारी २०२५




# केज तालुक्यातील निमशासकीय संस्थेवरील ट्रेनी शिक्षकांच्या थकीत वेतनासाठी उपोषणाचा इशारा



**केज । प्रतिनिधी**

कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागाचा शासन निर्णय क्र. सकीर्ण २०२४/प्र.क्र.९०/ व्याशी ३ दि.०९ जुलै २०२४ नुसार शिक्षक प्रशिक्षणार्थी ट्रेनी शिक्षक मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजना अंतर्गत शिकाऊ प्रशिक्षणार्थी म्हणून दिनांक २६/०८/२०२४ ते दि.२५/०२/२०२५ या कालावधीसाठी ट्रेन शिक्षकांचा सर्व शाळेवर गटशिक्षण कार्यालय यांच्यामार्फत मुख्यध्यापकांनी शैक्षणिक पात्रतेनुसार रुजू आदेश देऊन सर्व ट्रेनिंग शिक्षकांची निवड करण्यात आली परंतु जिल्हा परिषद शाळेबरोबर निमशासकीय शालेय संस्थेवरील ट्रेनिंग शिक्षकांची ऑनलाईन माहिती अपलोड केली नाही. गेले पाच महिने झाले आम्ही शाळेत नेहमीप्रमाणे जात आहोत. त्यामुळे आतापर्यंत आम्ही केलेल्या कामाचा मोबदला देण्यात यावा यासंबंधी संबंधित कार्यालयाशी वारंवार संपर्क केला असता आमच्याकडे अशी कुठलीही माहिती नसल्याचे ते सांगत आहे. जर माहिती नाही तर आम्हाला रुजू करून घेण्याचे आदेश दिले कोणी असा प्रश्न उपस्थित होत आहे. आम्ही लोक आधीच बेरोजगार तरुण होतोत आता सरकारने आम्हाला परत बेरोजगार केले व त्यांची फसवणूक केली. त्यामुळे दिनांक १०/०२/२०२५ रोजी केज तहसीलदार साहेब, गटशिक्षणाधिकारी केज, गट विकास अधिकारी यांना निवेदनाद्वारे विनंती केली असता आत्तापर्यंत कुठल्याही प्रकारची आम्हाला माहिती मिळाली नसल्याकारणाने शिक्षणाधिकारी कार्यालय बीड याठिकाणी निवेदन देऊ उपोषणाचा इशारा देखील देणार आहेत.

## कवडगाव येथे घरकुल लाभार्थ्यास प्रमाणपत्राचे वाटप




वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील कवडगाव येथील ग्रामपंचायत कार्यालय येथे प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा -२ सन २०२४-२५ वर्षातील मंजूर लाभार्थ्यांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले सध्या पूर्ण महाराष्ट्रामध्ये प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत गोरगरीब नागरिकास त्याच्या हक्काचे घर मिळावे यासाठी प्रधान मंत्री आवास योजने अंतर्गत घरकुलाचे वाटप करण्यात येत आहे. त्याच अनुषंगाने कवडगाव येथील प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत मंजूर लाभार्थ्यास प्रमाणपत्राचे वाटप करत सर्व लाभार्थ्यांनी आपले हक्काचे घर बांधून घ्यावे अशा सूचना करत लाभार्थ्यास प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले यावेळी गावचे सरपंच बशीर भाई शेख. ग्रामपंचायत सदस्य सतीष सोनवणे.ग्रा.पं. सदस्य दगडू कानाडे. ग्रा.पं.सदस्य नवनाथ करे. ग्रा.पं. सदस्य अनिल नांदुरकर. मा.जि. ग्रा.पं.सदस्य शिवलिंग उंडाळकर. जि.प. शाळेचे मुख्याध्यापक बडे सर शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शेरू भाई पटेल. ग्रामपंचायत कर्मचारी महादू राशवे. नवनाथ पडगन. शेरू भाई. सह घरकुल भार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिक्षकांच्या आंतर जिल्हा बदलीचा ऑनलाईन सातवा टप्पा तात्काळ राबविण्याची राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघाची मागणी

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील प्राथमिक शिक्षकांच्या ऑनलाईन बदल्यांची प्रक्रिया कालबध्द पध्दतीने माहे एप्रिल मे महिन्यात राबवली जाते मात्र लोकसभा व विधानसभा निवडणूक आचारसंहिता असल्याने ती राबवली गेली नाही. ही प्रलंबित बदली प्रक्रिया पवित्र पोर्टल शिक्षक भरती पूर्वी राबवावी.. शैक्षणिक वर्ष २०२४/२५ ची सेवाजेष्ठता ग्राह्य धरावी, प्रचलित बदलीचे ऑनलाईन पद्धतीचे बदली



धोरण कायम ठेवावे, यापूर्वी फॉर्म भरलेल्या शिक्षकांना ऑनलाइन बदली प्रक्रियेत प्राधान्यक्रम बदलण्यास संधी द्यावी व जून २०२५ पात्र निकष लावून नव्याने पात्र होणाऱ्या शिक्षकांना ही आवेदन पत्र भरण्यास संधी उपलब्ध करून द्यावी..वर्षानुवर्षे आपल्या कुटुंबापासून दूर असलेल्या,पती पत्नी वेगवेगळ्या जिल्ह्यात कार्यरत असलेल्या महिला/पुरुष शिक्षकांना कौटुंबिक न्याय द्यावा अन्यथा आपल्या न्याय हक्कांसाठी व संविधानिक मागणीसाठी आपल्या कुटुंबासह बदली प्रतीक्षेत असलेल्या शिक्षकांना घेऊन आझाद मैदानावर आंदोलन करण्यात येईल..त्यामुळे दुर्लक्षित होत असलेल्या या प्रश्नांकडे जाणीवपूर्वक लक्ष देऊन ऑनलाइन बदली प्रक्रियेचे आदेश निर्गमित करावेत अशी आग्रहाची मागणी राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघाच्या वतीने ग्रामविकास विभागाकडे करण्यात आलेली आहे.याबाबतचे निवेदन ग्रामविकासमंत्री यांचे स्वीय सहाय्यक श्री नारायण गोरे यांना देण्यात आले.

निवेदनावर संघटनेचे प्रदेशाध्यक्ष अनिल नाचपल्ले, सरचिटणीस संतोष भोजणे, राज्य प्रसिद्धीप्रमुख लहू राक्षे,राज्य पदाधिकारी-सुखदेव भालेकर,पंकज काटकर, दयानंद जवळगावकर, बालाजी माळी, रवी गुट्टे ,भागवत पदकोंडे,पुरुषोत्तम मेहेत्रे, सुभाष सानप, संजय मळभागे, रामेश्वर कांदे, अनंत फुलसुंदर, राजेंद्र होले, सुरेश घुले, विजय बाचणे, मनीषा रासकर,गणेश अवचार,दिलीप गोरे आदी पदाधिकाऱ्यांच्या सह्या आहेत.



**बीड : श्रीसंत भगवानबाबा सामाजिक प्रतिष्ठान बीड येथे २९ व्या सर्वधर्म समभाव राष्ट्रीय एकात्मता अखंड हरिनाम सप्ताहात रविवार दि. २३ फेब्रुवारी २०२५ रोजी भागवताचार्य तथा रामायणाचार्य ,स्वररत्न ह.भ.प . अंजलीताई केंद्रे उदगीरकर यांचे अमृततुल्य कीर्तन संपन्न झाले. यावेळी त्यांना सन्मानपत्र देऊन सत्कार करताना डॉ. संजय तांदळे, नारायण नागरे, बाजीराव ढाकणे आदी दिसत आहेत.**

पान ६ वरून...

### राष्ट्रसंत भगवानबाबांनी अध्यात्म

गजरात कौतुक केले.

कीर्तनास ह.भ.प. खरमाटे महाराज, महामंडलेश्वर शिवरुद्रनंद महाराज, गो.गो. मिसाळ, बाबुराव मुंडे महाराज, बाजीराव खेडकर, अनिरुद्ध सानप, डॉ.शिवाजी सानप, डॉ. माधव सानप, तुकाराम केदार विनोद घुले, महादेव घोळवे, विलास कुटे, बाजीराव केदार, डॉ. संजय तांदळे, अशोक सानप, गणेश खाडे, उमेश फड, पत्रकार अनंत घिगे, नागरे नाना, ज्ञानोबा वायबसे, सुधाकर सानप, यांच्यासह भाविक श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### डॉ.श्रीपाल सबनीस यांच्या

रोजी दु. ४ वा. ज्ञानोबा माऊली फड, धनेश बोगावत,अशोक शिरसाट,संदिप शेठ लाहोटी,दत्तात्रय मिसाळ, नाना महाराज कदम यांच्या सन्माननीय उपस्थितीत चि. दिग्विजय जगदाळे यांचे पखवाज सोलो वादन होईल. त्यानंतर वारकरी संगीत परंपरेची सद्य स्थिती या विषयावर श्री बी. ए. सानप महाराज यांचे व्याख्यान होईल. संमेलनाची सांगता संमेलनाध्यक्ष प्रख्यात गायक आणि प्रतिभावंत संगीतकार पं. यादवराज फड यांच्या गायनाने होईल. त्याना तबला शेखर दरवडे , हार्मोनियम मकरंद खरवंडीकर मृदंग मनोज सोळंके टाळ किरण जोशी हे करतील. संमेलनाचे सूत्रसंचालन नामदेव गिरी हे करतील.ही माहिती संमेलनाचे कार्याध्यक्ष श्री सुनील मिसाळ यांनी दिली. यावेळी नाना महाराज कदम हे ही उपस्थित होते.

### युरोपमध्ये होणाऱ्या कुडो

गेवराई विधानसभा मतदारसंघातील मोजै सुर्डी येथील सौरभ जाधवची निवड करण्यात आली. युरोप येथे जून २०२५ मधे होणाऱ्या कुडो वर्ल्ड कप स्पर्धेसाठी सौरभची निवड झाली असून राष्ट्रीय कोच हांशी मेहुल वोरा यांच्या मार्गदर्शनाखा भारत देशाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी युरोप येथे टीम इंडिया जाणार आहे. सोरभला प्रशिक्षक अरविंद मोरे, ज्ञानेश्वर गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले.

सौरभ जाधवची निवड झाल्याबद्दल आ. विजयसिंह पंडित यांनी त्यांचा सत्कार करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. गेवराई विधानसभा मतदारसंघाच्या क्रीडा क्षेत्रात चांगले वातावरण तयार होत सौरभ जाधवची निवड मतदारसंघासाठी अभिमानास्पद आहे असेही विजयसिंह पंडित यावेळी बोलताना म्हणाले. याप्रसंगी सुर्डीचे सरपंच महादेव सोळुंके, राम कुलकर्णी, अर्जुन कुलकर्णी, यश अतकरे, गणेश सुर्डीकर आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### बीडमध्ये 'प्लास्टिक मुक्त

या मोहिमेत व्यापारी महासंघ (कॅट) आणि बागवान संघटनेच्या सदस्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. विशेष म्हणजे, व्यापाऱ्यांनी आनंदग्रामच्या युवा कार्यकर्त्यांचा उत्साह वाढवण्यासाठी त्यांना चहा, नाश्ता आणि फळांचा पाहुणचार दिला. पर्यावरण संरक्षणाच्या दिशेने आणखी एक महत्त्वाचे पाऊल उचलत, कार्यकर्त्यांनी नागरिकांना आणि व्यापाऱ्यांना कापडी पिशव्यांचे वाटप केले. प्लास्टिकचा वापर टाळावा आणि कापडी पिशव्या स्वीकाराव्यात, असा संदेश त्यांनी दिला.

या अभियानात व्यापारी महासंघ, बागवान संघटना, सामाजिक संस्था, महाविद्यालयीन विद्यार्थी आणि स्थानिक नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. पर्यावरण रक्षणासाठी संपूर्ण शहराने एकत्र येत दिलेला हा संदेश निश्चितच सकारात्मक बदल घडवेल.

''स्वच्छता हीच सेवा'' या गाडगेबाबांच्या तत्त्वाचा अवलंब करत, बीड शहराने प्लास्टिक मुक्ततेच्या दिशेने एक महत्वपूर्ण पाऊल उचलले आहे. हे अभियान पुढील काळातही सातत्याने राबवून बीड शहराला संपूर्णपणे प्लास्टिक मुक्त करण्याचा निर्धार आनंदग्रामच्या कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे.

### स्वातंत्र्यवीर सावरकर हे विज्ञाननिष्ठ

की, माजलगाव ही वैचारिक भुमी आहे. हे आपली व्याख्यानाला असलेली उपस्थिती दर्शवते. या सत्राचे आभार व्याख्यानमाला समितीचे कार्यवाह डॉ गजानन होन्ना यांनी मानले व सुत्रसंचलन प्रा डॉ रमेश गटकळ यांनी केले. वैयक्तिक पद्य चैतन्य आहेर यांनी सादर केले. या सत्राची सांगता वंदेमातरम ने झाली. यावेळी केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे पालक प्रकाश दुगड, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य अमरनाथ खुर्पे, विष्णुपंत कुलकर्णी, महाविद्यालय समितीचे अध्यक्ष अभय कोकड, प्राथमिक शालेय समितीचे अध्यक्ष पवन मानधने, शिशु विहार चे अध्यक्ष लक्ष्मीकांत कुलकर्णी, सीबीएसई चे अध्यक्ष तेजस महाजन, स्थानिक संस्था सभासद, शहरातील डॉक्टर, व्यापारी, वकील, पत्रकार, महिला पुरुष पालक, संकुलाचे माजी विद्यार्थी, प्राचार्य डॉ मुकुंद देवर्षी, मुख्याध्यापक संतोष लिंबकर सर, मुख्याध्यापिका श्रीमती सुमती गिरी, सीबीएसई च्या प्राचार्या श्रीमती वंदना मिटकरी, शिशु विहार च्या श्रीमती वर्षा कुलकर्णी, अधिकारी, पदाधिकारी, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### कोरोना काळात रूग्णवाहीकेची

सर्व थकीत बिले लवकरात लवकर अदा करण्यात यावेत असे निवेदन दिले. व सर्व बिले लवकरात लवकर जमा न केल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शिवसेना स्टाईल आंदोलन करण्याचा इशारा यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी दिला. यावेळी सोबत निकेश जगदाळे,सुभाष यादव,रमेश सुडे,कैलास धुमाळ, महेश मोरे, परमेश्वर बिल्पे, परमेश्वर मोरे, अशोक गिराम, दत्ता ढोंगे, अंगद कोथिंबीरे, राजेंद्र मोरे, अंबादास मोरे, मिठू नागरगोजे, हनुमंत नागरगोजे, पोपट वक्ते, बाळासाहेब वनवे सह सर्व उपस्थित होते.

## मुर्शदपूर येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात हरिनाम सप्ताहाचे आयोजन

आष्टी । प्रतिनिधी

सालाबादप्रमाणे साधु संतांच्या आशीर्वादाने आणि माजी आ.साहेबराव दरेकरनाना यांच्या मार्गदर्शनाखाली आष्टी - मुर्शदपूर (गणेशनगर) येथे दि.२५ फेब्रुवारी ते दि.४ मार्च २०२५ या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा आयोजित केला आहे.

या सप्ताहात टाळ,विणा, पखवाज,ज्ञानेश्वरी ग्रंथ पुजन पांडुरंग शास्त्री देवा (सौताडा), ह.भ.प.दिनकरराव तांदळे महाराज,ह.भ.प.श्रीहरि पुरी महाराज,ह.भ.प.ब्रम्हचैतन्य तावरे महाराज,ह.भ.प.अशोक महाराज डोके सर,ह.भ.प. रामदास महाराज डोरले यांच्या हस्ते होणार आहे.या सप्ताहात व्यासपीठ चालक म्हणुन ह.भ.प.काशीनाथ महाराज शेंबडे,ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज जगताप सर हे काम पाहणार आहेत. या सप्ताहात काकडा, ज्ञानेश्वरी पारायण,गाथा भजन, हरिपाठ,हरिकीर्तन आदि धार्मिक कार्यक्रम होणार आहेत.या सप्ताहात ह.भ.प. गोविंद महाराज पवार,ह.भ.प. सोनाजी बापु शिंदे महाराज, ह.भ.प.श्रीनिवास महाराज घुगे,ह.भ.प.आदिनाथ महाराज दानवे,शिवचरित्रकार ह.भ.प. दिपालीताई खिळे शास्त्री, ह.भ.प.राम महाराज शास्त्री, ह.भ.प.संतोष महाराज मोरे यांचे हरिकीर्तन होणार आहेत. मंगळवार दि.४ मार्च २०२५ रोजी सकाळी ९ ते ११ यावेळात ह.भ.प.कैलास महाराज भोरे (देवदैठण) यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे अशी माहिती सप्ताह समिती व संयोजक ह.भ.प.धोंडीबापु वांढरे महाराज यांनी दिली.

# मातृभाषेच्या शिक्षकांत भाषा, विचार आणि कल्पनेचा विलक्षण गोडवा -कवी अनंत कराड

**पाटोदा । प्रतिनिधी**

''संवाद हा माणसाचा धर्म आहे; किंबहुना अमृता पेक्षाही गोड असलेल्या मराठी भाषेविषयीची गौरवाची भावना आहे, असे सांगून शब्द सामर्थ्यावर सार्थ विश्वास असलेल्या मराठी भाषा विषय शिक्षकाच्या विचार, वाणी आणि कल्पनेत विलक्षण गोडवा असतो!'' असे गौरवोद्गार महाराष्ट्र राज्य एकता फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा सुप्रसिद्ध कवी साहित्यिक अनंत कराड यांनी काढले.



महाराष्ट्र राज्य मराठी भाषा विषय शिक्षक महासंघाच्या बीड जिल्हा कार्यकारणी नुकतीच जाहीर करण्यात आली आहे. त्या पार्श्वभूमीवर आर्वी येथील शांतीवन इमारतीच्या मुख्य कार्यालयात महाराष्ट्र एकता फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष कवी साहित्यिक अनंत कराड, कवी महादेव राऊत, राजेश बिडकर आणि पदाधिकाऱ्यांच्या वतीने मराठी विषय भाषा महासंघाचे बीड जिल्हा सचिव तथा सुप्रसिद्ध सूत्रसंचालक निवेदक आणि लेखक प्रा.बिभिषण चाटे, बीड जिल्हा प्रतिनिधी तथा अध्यक्ष प्रा. डॉ. आत्माराम झिंजुर्डे, प्रा गलांडे आदींचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

कवी अनंत कराड पुढे म्हणाले, ''जगातील सौंदर्यपूर्ण वस्तू म्हणजे पुस्तक असते. पुस्तके ही मानवी जीवन आनंदी आणि अर्थपूर्ण करतात. मातृभाषेतील साहित्य हे आत्म्यातून निर्माण झालेले असते. मराठी भाषा विषय शिक्षक हा संवेदनशील मनाचा, विचार, कल्पना आणि वाणीतील गोडव्याचा प्रतिभाशाली भाग्यवान असतो, अशी पुस्ती ही त्यांनी जोडली. यावेळी महाराष्ट्र राज्य मुप्टा असोसिएशनचे बीड जिल्हा कार्याध्यक्ष प्रा. शशिकांत जावळे, साहित्यिक भास्कर खरमाटे, महादेव राऊत, राजेश बिडकर, एस. ई. ढाकणे, प्रा.प्रशांत मळेकर आदी सह शिक्षक प्राध्यापक उपस्थित होते.

मातृभाषा ही आत्म्याची भाषा!

मराठी आत्म्याची भाषा असून ती अमृता पेक्षा गोड आहे. संत ज्ञानेश्वरांनी मराठी भाषेचे महत्व अधोरेखित केलेले आहे. बोलीत आपुलकी आणि स्नेहाचा गोडवा असून मराठी भाषा शिक्षक आणि साहित्य या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. मराठी भाषा साहित्यातून समता आणि बंधुत्वाचा अविष्कार ही पूर्वापार परंपरा आहे. ती जपण्याचा प्रयत्न करू..!

प्रा.बिभिषण चाटे, (बीड जिल्हा सचिव, मराठी भाषा विषय प्राध्यापक महासंघ महाराष्ट्र )

# शाळेतून निरोप घेतांना विद्यार्थ्यांनी शिक्षक व शाळेप्रती कृतज्ञ असावे-भागवत मसने

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

दहावी किंवा बारावीच्या विद्यार्थ्यांनी शाळेतून निरोप घेतांना आपल्या शिक्षक व शाळांप्रति कृतघ्न असावे असा सल्ला सुप्रसिद्ध वात्रटिकार तथा शिक्षक भागवत मसने यांनी दिला. ते होळेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, होळ येथे इयत्ता दहावी विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभ प्रसंगी बोलत होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी संस्थेचे संस्थापक परमपूज्य नारायण दादा काळदाते यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या निरोप समारंभाचे प्रमुख अतिथी म्हणून भागवत मसने यांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी शाळेचे माजी विद्यार्थी सुधीर शिंदे महसूल सहाय्यक, मीरा राख कर सहाय्यक, कांचन हरगावकर जेल पोलीस हे देखील उपस्थित होते.



या कार्यक्रम प्रसंगी बोलताना सुप्रसिद्ध वात्रटिका कार भागवत मसने म्हणाले की शालेय जीवना पासूनच शिक्षक, शाळा विद्यार्थ्यांच्या वेगवेगळ्या कलागुणांना वाव देतात. शाळेतील प्रत्येक विषयाचे शिक्षक वेळोवेळी मार्गदर्शन करतात. आणि पायाभूत स्तरापासूनच आपल्याला घडवण्याचे काम ते करतात . त्यामुळेच विद्यार्थी हे शाळेतुन बाहेर पडल्यानंतर या सर्व बाबींचा बळावरच पुढे आपल्या आयुष्याची वाटचाल करत असतात. विद्यार्थ्यांनी देखील आपण आपल्या क्षेत्रात उत्तुंग भरारी घेत असताना शिक्षक व आपल्या शाळेप्रती कृतज्ञेची भावना सदोदित बाळगावी असे मार्मिक आवाहन उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना केले.

घाल घाल पिंगा वाऱ्या माझ्या परसात ; माहेरी जा सुवासाची कर बरसात: आज याच भावनेने या शाळेचे माजी विद्यार्थी जे एम पी एस सी च्या पदावर नियुक्त झालेले सुधीर शिंदे, महसूल सहाय्यक, मीरा राख, कर सहाय्यक/ महसूल सहाय्यक तर कांचन हर गावकर जेल पोलीस/मुंबई शहर पोलीस, शाळेच्या वतीने आपला सत्कार स्वीकारण्यासाठी आले असतील अशी आशा मसने यांनी व्यक्त केली. अशाच सर्व यशस्वी विद्यार्थ्यांच्या वाटेवर आपण चालावे व आपले , पालकाचे व शाळेचे नाव उज्वल करावे असेही मत सुप्रसिद्ध वात्र टीकाकार कवी भागवत मसने यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर करत असताना भान ठेवावे. वारंवार सेल्फी काढल्याने आपल्या रूपात काहींही बदल होत नाही. सेल्फीनेच अनेक जीवांचा घात केला आहे. त्यामुळे या मोबाईलचा आपल्या जीवनात सकारात्मक व विधायक कामासाठीच विद्यार्थ्यांनी उपयोग करान्याचा सल्ला कवी भागवत मसने यांनी दिला. विद्यार्थी दशेतच आपले लक्ष्य ठरवून आपली प्रगती आपण साध्य करावी. तसेच मी आयुष्यात कधीच कॉपी करणार नाही हा संकल्प देखील आपल्या मनाशी दृढ करावा.निश्चितच यश आपल्या पदरात पडतअसे मसने यांनी सांगितले.

या प्रसंगी व्यासपीठावर मुख्याध्यापक मलदोडे ,पालक सूर्यभान राख , ग्रंथपाल देशमुख मॅडम, केंद्रे मॅडम या उपस्थित होत्या. या निरोप समारंभाचे बहारदार असे सूत्रसंचालन राठोड सर यांनी केले. तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे सर्व शिक्षक , शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले.

## जयंत केजकर यांचे बहारदार गायन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

संगीत साधना मंचच्या वतीने आयोजित बारावी मासिक शास्त्रीय संगीत सभा उत्साहात संपन्न झाली.

पुणे येथील गायक जयंत केजकर यांच्या बहारदार गायनाने सर्व रसिक मंत्रमुग्ध झाले. संगीत शिकणाऱ्या सर्व संगीत साधकांसाठी जयंत केतकर यांचे गायन एक आदर्श सादरीकरण झाले. मारवा रागाची घराणेदार विलंबित ख्याल मांडणी,त्यानंतर खमाज रागात डौलदार बंदिश आणि नाट्यगीत सादर झाले.पहाडी राग अंगाचे सुंदर भजन गाऊन भैरवी तील अप्रतीम बंदिशी ने मैफिलीची सांगता झाली. यांना तबल्यावर महेश साळुंके यांनी तर संवादिनीवर विश्वजीत धाट यांनी साथसंगत केली. या सभेसाठी रसिक श्रोते इतर मान्यवर उपस्थित होते.

# केंद्रीय कृषिमंत्री आणि शेतकऱ्यांतील बैठकीत तोडगा नाहीच; पुढील बैठक १९ मार्चला

नवी दिल्ली - वृत्तसंस्था

केंद्रीय मंत्री शिवराजसिंह चौहान आणि शेतकरी नेत्यातील दुसऱ्या बैठकीत तोडगा निघाला नाही. त्यामुळे केंद्र सरकारने पुढील बैठकीसाठी १९ मार्चपर्यंतची वेळ मागवली आहे. शनिवारी संध्याकाळी ६ वाजता बैठक सुरू झाली होती. ही बैठक रात्री उशिरापर्यंत सुरू होती.

या बैठकीत केंद्रीय मंत्री शिवराजसिंह चौहान आणि मंत्री प्रल्हाद जोशी सहभागी झाले होते. यावेळी पंजाब राज्य सरकारकडून कृषिमंत्री आणि तीन मंत्री बैठकीत हजर राहिले. तर संयुक्त किसान मोर्चा आणि किसान मजूर मोर्चा मागण्यांवर ठाम राहिले. त्यामुळे केंद्र सरकारने आणखी वेळ मागवला आहे. परंतु तोडगा न निघाल्याने शेतकरी नेत्यांनी मात्र संघर्ष सुरूच राहील, अशी भूमिका स्पष्ट केली आहे. चंडीगड येथील या बैठकीत केंद्रीय कृषिमंत्र्यांनी संयुक्त किसान मोर्चा अराजकीयचे नेते जगजितसिंह डल्लेवाल यांची भेट घेतली. त्यांच्या तब्येतीची चौकशी केली. तसेच इतर शेतकरी नेत्यांशी चर्चा केली. डल्लेवाल यांचं



उपोषण अद्यापही सुरू आहे. त्यामुळे या बैठकीसाठी डल्लेवाल यांना खनौरी सीमेवरुन चंडीगड येथे रुग्णवाहिकेत आणण्यात आलं. या बैठकीत मात्र चांगली चर्चा झाल्याची माहिती शेतकरी नेत्यांनी दिली आहे. केंद्र सरकार आणि शेतकरी नेते यांच्यातील तिसरी बैठक १९ मार्च रोजी होणार आहे. या बैठकीला केंद्र सरकार आणि शेतकरी नेत्यांसह पंजाब सरकारचे अर्थमंत्री हरपाल सिंग चीमा तसेच कृषिमंत्री गुरमित सिंग खुडिया आणि अन्न प्रक्रिया मंत्री लालचंद कतरूचक उपस्थित राहणार आहेत. यापूर्वी १४ फेब्रुवारी केंद्र सरकार आणि शेतकरी नेत्यांमध्ये पहिली बैठक झाली होती. या बैठकीत तोडगा निघाला नव्हता. शेतकरी नेते हमीभाव कायद्याच्या ग्यारंटीसह विविध मागण्यांवर ठाम आहेत. मागील वर्षभरापासून खनौरी आणि शंभू सीमेवर ठाण मांडून बसले आहेत. तर २६ नोव्हेंबरपासून शेतकरी नेते जगजित डल्लेवाल उपोषणाला बसले आहेत. एक वर्ष या आंदोलनाची दखल न घेणाऱ्या सरकारने आता मात्र आंदोलक शेतकऱ्यांशी चर्चा सुरू केली आहे. त्यामुळे या चर्चेतून काही तोडगा निघेल का याकडे शेतकऱ्यांचं लक्ष लागून आहे. दरम्यान, पंजाबमधील शेतकऱ्यांनी केंद्र सरकारकडून हमीभाव कायद्याच्या ग्यारंटीची मागणी केली आहे. जोवर केंद्र सरकार शेतकऱ्यांच्या सर्व मागण्या मान्य करत नाही तोवर शेतकरी आंदोलन सुरूच राहील, अशी भूमिका स्पष्ट केली आहे.

# कोंबड्यांच्या फायदेशीर देशी जाती



भारतातील राज्याच्या कुक्कटपालनात महाराष्ट्राचा नंबर बराच वरचा असला तरी अजून वाढत्या लोकसंख्येच्या मागणीबरोबर अर्थिक उदारीकरणामुळे निर्यातसंधीचा फायदा घेण्यासाठी मोठे ध्येय साध्य करता येणार आहे. चांगल्या कुक्कट उत्पादनासाठी चांगल्या पक्ष्यांचा पुरवठा, पुरेसे भांडवल, प्रशिक्षण याचबरोबर सकस आणि चांगल्या प्रतीचे व कमी किंमतीचे कोंबडीखाद्य मुबलक उपलब्ध असणे आणि अंडी व मांस वितरणाची व्यवस्था असणे आवश्यक आहे. देशी जाती - भारतातील सर्व कोंबड्यांच्या जाती देशी या नावाने ओळखल्या जातात. निरनिराळ्या प्रदेशातील गुणवैशष्टयानुसार कोंबड्यांना नावे दिली आहेत. जाणून घेऊयात कोंबडीच्या देशी जाती.असील : शुध्द असील पक्षी मोठा, ताठर, करारी व रूबाबदार असतो. त्याच्या चोचीपासून तळव्यापर्यंतची उंची २८ इंच असते. डोके रूंद असून त्यावर लहान वाटाण्यासारखा लालभडक तुरा असतो. चेहरा थोडा लांबट व सडपातळ असून त्यावर पिसे असतात. अंकलेश्वर : अंकलेश्वर येथून त्याच गावाचे नाव धारण करून कोंबडी प्रसिध्द झाली. अंगाने मध्यम असणारी ही कोंबडी अनिष्ट वातावरणास चांगली टक्कर देते, जडण-घडण चांगली अंडी देणाऱ्या कोंबडीसारखीच आहे.

चितगाव : ही कोंबडी भारताच्या पूर्व भागात आढळते. उंच व वजनदार असते. डोके लांबट असनू चोच लांब व पिवळ्या रंगाची असते. अंगावरची पिसे शरीराला पखडून बसलेली असतात. त्यांचा रंग पांढरा, काळा, तपकिरी, राखी अशा वेगवेगळ्या प्रकारचा असतो. बसरा : लहान व मध्यम आकाराची ही कोंबडी महाराष्ट्र आणि गुजरात सीमेवभर आढळते. शरीराची जडणघडण चांगली अंडी देणाऱ्या कोंबडीसारखी असून शरीर खोलगट आहे. ही कोंबडी आजाराला लवकर बळी पडते. कडकनाथ : या जातीचे खरे नाव कालामाती म्हणजे काळी आतडी असणारी पक्षी असे आहे, परंतु कडकनाथ या नावाने प्रसिध्द आहे. मध्य प्रदेशातील मागासलेल्या भागात या जातीची मोठ्या प्रमाणात जोपासना केली जाते. ही कोंबडी फिकट असून तांबूस रंगाची आणि फारच कमी म्हणजे वार्षिक ८० अंडी घालते. चामडी, चोच, पाय काळे असतात. ही कोंबडी आजाराला चांगली टक्कर देते. काश्मिरी : ही कोंबडी काश्मिर प्रांतात मोठ्या प्रमाणावर आढळते. पिसांचा रंग तांबडा आणि काळा असून चोच व पाय पिवळे असतात. मादीची अंडे देण्याचे प्रमाण सर्वसाधारण असून तिचे वजन दोन किलो असते. नराचे वजन दोन ते अडीच किलो असते. टेनिस नेकेड नेक : या कोंबडीच्या गळ्याभोवती पिसे नसतात, म्हणून हिला नेकेड नेक असे नाव पडले. ही कोंबडी महाराष्ट्रात सर्वत्र सापडते. हिच्या आकार व रंगामध्ये विविधता आढळते. पंजाब ब्राऊन : ही कोंबडी मुख्यत्वेकरून पंजाब, हरियाना या राज्यात सापडते. पिसाचा रंग तपकिरी असतो तर चोच व पाय पिवळे असतात. या कोंडबीच मांस चविष्ट असल्यामुळे तिचा खाण्यासाठी मोठ्या प्रमाणात वापर केला जातो.

# बारमाही चालणारी झेंडू शेती फायद्याचीच

धार्मिक आणि सामाजिक उत्सवांमध्ये झेंडूच्या फुलांना खूप महत्त्व आहे. झेंडूच्या फुलांना दसऱ्याला खूप मागणी असते. झेंडूची फुले खराब न होता बराच काळ टिकतात. ही फुले खुल्या बाजारात विकली जातात तसेच हार बनवण्यासाठीही वापरली जातात. झेंडूचा वापर भारतात लग्नाच्या विधींना सजवण्यासाठी केला जात असल्याने या फुलांना जास्त मागणी आहे. ही प्रामुख्याने सजावटीची वनस्पती आहे. त्याची जगभरात लागवड केली जाते.

लागवडीसाठी हवामान :राज्यात झेंडूचे उत्पादन तिन्ही हंगामात घेतले जाते आणि त्याला नेहमीच मागणी असते. झेंडूची लागवड पावसाळा, हिवाळा आणि उन्हाळा या तिन्ही ऋतूंमध्ये केली जाते. फुले मध्यम हवामानात चांगली वाढतात. रात्रीचे १५ ते १८ अंश सेल्सिअस तापमान झाडाच्या वाढ व उत्पादनासाठी पोषक असते. जास्त पाऊस या पिकास हानिकारक ठरतो.

झेंडूसाठी जमीन :झेंडूची लागवड विविध प्रकारच्या जमिनीत करता येते. सुपीक, पाणी टिकवून ठेवणारी, परंतु पाण्याचा चांगला निचरा होणारी माती झेंडूसाठी चांगली असते. सामू ७ ते ७.५ पर्यंत, भरपूर सेंद्रिय कर्बनी युक्त जमिनीत रोप चांगले वाढते. झेंडू पिकाला भरपूर सूर्यप्रकाश लागतो. झाडे सावलीत चांगली वाढतात पण फुले कमी मिळतात.लागवडीपूर्वी प्रथम जमीन नांगरून, कुळवून भुसभुशीत करावी. सपाट वाफा, सरी वरंबा आणि रुंद सरी किंवा गादीवाफ्यावर झेंडूची लागवड करतात.

लागवड पद्धत : लागवडीसाठी जमीन तयार रताना पुरेसे शेणखत



जमिनीत मिसळावे. झेंडूची लागवड करताना ६० से. मी. अंतरावर घेतलेल्या सरीच्या मध्यभागी ३० से. मी. इतके दोन रोपांमधील अंतर ठेवून लागवड करावी. ६० ३० से. मी. अंतरावर लागवड केल्यास हेक्टरी ४०,००० रोपे लागतात. लागवड करतांना भरपूर पाण्यामध्ये व सायंकाळी ४ नंतर लागवड करावी. लागवड करताना रोपांची मुळे कॅप्टन ०.२५% द्रावणात १० मिनिटे बुडवून लावावीत. म्हणजे रोपांची मर होत नाही.

खते आणि पाणी व्यवस्थापन : झेंडूसाठी १०० : ७५ : ७५ किलो नत्र, स्फुरद आणि पालाश या रासायनिक खताची मात्रा शिफारस करण्यात आली आहे. संपूर्ण स्फुरद व पालाश तसेच अर्ध्या नत्राची मात्रा लागवडीच्या सुरवातीला द्यावी. उरलेले अर्धे नत्र पुनर्लागवडीनंतर ३० ते ४० दिवसांनी द्यावे. नत्राची मात्रा जास्त झाल्यास झेंडूची शाकीय वाढ भरपूर होते व फुलांचे कमी उत्पादन मिळते. पहिली खुरपणी झाल्यानंतर झेंडूच्या पिकाला हेक्टरी २५ किलो नत्र, २५ किलो स्फुरद आणि २५ किलो पालाश देऊन झाडांना मातीची भर लावावी. फक्त नत्रयुक्त खत अथवा अधिक नत्र वापरु नये. ठिबक सिंचन पद्धतीमध्ये विद्राव्य खताचा वापर करावा. माती ओलसर राहील परंतु पाणी साचणार नाही याची खात्री करण्यासाठी नियमित अंतराने सिंचन केले पाहिजे. खरीप हंगामात पाऊस नसेल तर १५ ते २० दिवसांनी हिवाळ्यात १० ते १५ तर उन्हाळ्यात ५ ते ७ दिवसांनी पाणी द्यावे. फुलबहाराच्या काळात, झाडांना कळ्या आल्यापासून तोडणी संपेपर्यंत पिकाला पाण्याचा ताण पडू देवू नये. जास्त पाण्यामुळे रूट कुजणे आणि बुरशीजन्य रोग होऊ शकतात. तसेच याच काळात आवश्यकतेपेक्षा जास्त पाणी देऊ नये.

कीड आणि रोग : झेंडूवर बुरशीजन्य रोगांचाही परिणाम होऊ शकतो, जसे की भुरी आणि करप्या. कोणतीही प्रभावित पाने काढून टाका आणि आवश्यक असल्यास बुरशीनाशकाने उपचार करा.पांढरी माशी, मावा, तुडतुडे प्रादुर्भाव आढळल्यास एसिफेट- १ ग्राम किंवा डाय मिथोएट १ मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून १० ते १५ दिवसांच्या अंतराने फवारणी करावी. लाल कोळी पासून झेंडूचे संरक्षण करण्याकरिता डायकोफॉल २ मिली १ लिटर पाण्यात मिसळून फवारावे. केसाळ अळीच्या नियंत्रणासाठी १लिटर पाण्यात २मिली क्विनॉलफॉस (२५% प्रवाही) या प्रमाणात मिसळून पिकावर फवारावे.

# उन्हाळी हंगामातील भाजीपाला पिकांचे नियोजन

महाराष्ट्रात उन्हाळी हंगामात प्रामुख्याने कलिंगड, खरबूज, काकडी, दोडका, घोसाळी, कारली, दुधी भोपळा, तोंडली, तांबडा भोपळा, भेंडी, गवार, टोमॅटो, वांगी, मिरची, चवळी, घेवडा, कोथिंबीर, कांदापात, मेथी, राजगिरा, माठ, पोकळा यांचे उत्पादन घेतले जाते.

भेंडी, गवार : उन्हाळ्यामध्ये घेतल्या जाणाऱ्या भेंडी व गवार या भाज्यांना मागणीसुद्धा भरपूर असते. भेंडी लागवड करतेवेळी हळद्या रोगास प्रतिकारक्षम परभणी क्रांती, अर्क अनामिका, पुसा सवानी, पंजाब पद्मनी या वाणाची निवड करावी. गवारीसाठी पुसा सदाबहार, पुसा नवबहार यांसारख्या भरपूर उत्पादन देणाऱ्या जातीची निवड करावी. उन्हाळ्यात या पिकांना पाणी वेळेवर द्यावे. या पिकांची तोडणी संध्याकाळच्या वेळेस (५ नंतर) करावी. वेलवर्गीय भाजीपाला पिके : वेलवर्गीय भाज्यांमध्ये प्रामुख्याने काकडी, कारली, दुधी भोपळा, दोडका व घोसाळी या प्रमुख भाज्यांचा समावेश आहे. या सर्व भाज्यांची लागवड बियांद्वारे व रुंद अंतर ठेवून केली जाते. लागवडीनंतर बियांची उगवण झाल्यानंतर काही दिवसांनी वेलीला वळण देणे व आधार देणे ही कामे महत्त्वाची आहेत. दर्जेदार, अधिक उत्पादनासाठी वेलीला मंडप किंवा तारेच्या ताटीने आधार द्यावा. कारली, दुधी भोपळा, दोडका, घोसाळी ही कमकुवत वेलवर्गात मोडणारी पिके असून, वेलींना चांगल पिके असून, वेलींना चांगला आधार मिळाला तर त्यांची वाढ चांगली होते.



मिरची, वांगी आणि टोमॅटो : या तिन्ही पिकांची रोपे गादी वाफ्यावर करावी. डिसेंबर किंवा जानेवारी महिन्यात गादीवाफ्यावर बियाणे पेरून झाल्यानंतर साधारणपणे जानेवारी फेब्रुवारी महिन्यात रोपांची लागवड केली जाते. या पिकांमध्ये विषाणूजन्य रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी त्यांचा प्रसार करणाऱ्या किडींच्या नियंत्रणासाठी दक्ष राहावे. मिरचीची लागवड करतेवेळी तिचे उत्पादन मार्च ते मे महिन्यात बाजारात येईल असे करावे. लागवडीसाठी वाण हा उंची शाकीय वाढणारा, फांद्या जास्त असणारा, पोपटी ते गर्द हिरव्या रंगाच्या लांब मिरच्यांचा असावा. मिरचीमध्ये फुले ज्योती या जातीमध्ये मिरच्या झुपक्यात येतात व झाडावर दाट पाने असतात. वांगी या पिकासाठी उंच व डेरेदार वाढ असणारा काटेरी देठ, जांभळ्या, पांढऱ्या व हिरव्या रंगाची छटा एकत्र असणाऱ्या चकाकीदार गोल किंवा उभट गोल फळे येणाऱ्या वाणाची निवड करावी. वांग्यामध्ये रंग व आकार यानुसार भागनिहाय विविधता आढळून येते. वांगी पिकास शेणखत व रासायनिक खते यांचा संतुलित वापर करावा. उन्हाळी हंगामात योग्य वेळी पाणी द्यावे. फळांची तोडणी ५-६ दिवसांनी करावी. चांगली, एकसारखी फळे बाजारात पाठवावीत. टोमॅटो पिकासाठी वाण निवडताना प्रामुख्याने तो वाण अधिक पाने असणारा, उष्ण तापमानात फळधारणा होणारा, लीफ कर्ल व्हायरस या रोगास सहनशील व फळांना तडे न जाणारा निवडावा. टोमॅटोची लागवड शक्यतो लवकर करावी. कारण उष्ण हवामानात फळधारणा कमी होते. कांदापात महाशिवरात्रीस कांद्याची रोपे टाकून त्याची लागवड गुढीपाडव्यापर्यंत करावी. उन्हाळ्यात व आषाढी एकादशीपर्यंत कांद्याच्या पातीचे पैसे होतात.

कोथिंबीर : कोथिंबिरीच्या पिकास कोरडे हवामान मानवते. उन्हाळी हंगामात कमी पाण्यावर येणारे कोथिंबिरीचे पीक कमी कालावधीत चांगले पैसे देऊन जाते. कोथिंबीर पिकाची लागवड करताना वाफे तयार करावेत. दर आठ दिवसाच्या अंतराने कोथिंबिरीची लागवड करावी.

राजगिरा, पोकळा, माठ, मेथी : उन्हाळी भाजीपाल्यामध्ये पालेभाज्या महत्त्वाच्या आहेत. पालेभाज्या आपल्या आहारातील खनिजे, क्षार आणि जीवनसत्त्वाचा पुरवठा करणारे अगदी स्वस्त आणि सहजसुलभ नैसर्गिक स्रोत आहेत. शेतकऱ्यांच्या दृष्टीने पालेभाज्या या अल्प भांडवल, कमी क्षेत्रात, कमी वेळेत उत्पादन देतात. पालेभाज्या लागवडीसाठी पाण्याचा हमखास, सलग पुरवठा, बाजारपेठ जवळ असणे व वाहतुकीची चांगली सोय असणे या बाबी महत्त्वाच्या आहेत. उन्हाळी हंगामात प्रामुख्याने राजगिरा, पोकळा, माठ, मेथी या पालेभाज्या घेतल्या जातात.




## महत्वाच्या घटना

१५१० : पोर्तुगीज सरदार अल्बुकर्क याने अकस्मात हल्ला करुन पणजीचा किल्ला जिंकला.
१५६८ – सम्राट अकबर बादशहाने रजपुतांचा प्रचंड पराभव करुन चित्तोडगड आपल्या ताब्यात घेतला.
१८१८ : ले. कर्नल डिफनने चाकणचा किल्ला उध्वस्त केला. दख्खन ताब्यात आल्यावर इंग्रजांनी सह्याद्रीतील बहुतेक सर्व किल्ल्यांची मोडतोड केली.
१८६३ : आजच्या दिवशी अमेरिकेचे १६ वे राष्ट्राध्यक्ष अब्राहमन लिंकन यांनी अमेरिकेतील चलन कायद्यावर सही केली.
१९३५ : 'फॉक्स मॉथ' विमानाद्वारे मुंबई नागपूर जमशेदपूर या मार्गावरील हवाई टपाल सेवेला प्रारंभ झाला.
१९४५ : दुसरे महायुद्ध तुर्कस्तानने जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारले.
१९४५ : दुसरे महायुद्ध अमेरिकन विमानवाहू नौकांनी टोकियोवर बॉम्बहल्ला केला.
१९५२ : नार्वे ची राजधानी ओस्लो मध्ये आजच्या दिवशी हिवाळी ऑलिम्पिक समारोह पार पडला.
१९६२ : काँग्रेस सार्वत्रिक निवडणूक जिंकली.
१९६८ : मोहम्मद हिदायतुल्लाह यांनी भारताचे ११ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
१९८६ : जनआंदोलनाच्या रेट्यामुळे २० वर्षे राज्य केल्यानंतर फिलिपाइन्सचे राष्ट्राध्यक्ष फर्डिनांड मार्कोस यांनी सत्ता सोडुन देशातुन पलायन केले.
१९८८ – संपुर्ण भारतीय बनावटीच्या पृथ्वी या क्षेपणास्त्राची श्रीहरिकोट्टा या केंद्रावर यशस्वी चाचणी
१९९६ : 'स्वर्गदारा'तील तार्याला वि. वा. शिरवाडकर ऊर्फ कविवर्य कुसुमाग्रज यांचे नाव देण्यात आले. स्वित्झर्लंडमधील 'इंटरनॅशनल स्टार रजिस्ट्री' या आंतरराष्ट्रीय संस्थेने हा गौरव केला. मिथुन तारकासमुहातील कॅस्टर (पुनर्वसू) व पोलक्स जवळच्या तार्याचे 'कुसुमाग्रज तारा' असे नामकरण केले.
२००८ : 'नो कंट्री फ़ॉर ओल्ड मॅन'' या चित्रपटाला ८० व्या ऑस्कर अकादमी पुरस्कारासाठी निवडल्या गेले.
२००९ : आजच्या दिवशी माजी सैन्य अधिकारी धीरज मल्होत्रा यांना इंडियन प्रीमियर लीग चे
२०१३ : रशियन सरकार ने रस्त्यांवर आणि शाळेच्या जवळपास धूम्रपान न करण्याचा नवीन कायदा बनवला.

## जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८४० : विनायक कोंडदेव ओक बालवाङ्मयकार. मुलांसाठी 'बालबोध' हे मासिक काढून त्यांनी चरित्रे, कविता, निबंध, शास्त्रीय विषयांवरील लेख इ. लेखन केले व मराठी बालवाङ्मयाचा पाया घातला. त्यांची सुमारे पन्नास पुस्तके प्रसिद्ध झाली. सहज व सोपी भाषा हे त्यांचे वैशिष्ट्य होते. (मृत्यू:९ आक्टोबर १९१४)
१८९४ : अवतार मेहेरबाबा आध्यात्मिक गुरू, मौनव्रती संत, त्यांनी सलग ४४ वर्षे मौनव्रत पाळले होते. (मृत्यू: ३१ जानेवारी
१९६९ मेहराझाद, पिंपळगाव, अहमदनगर, महाराष्ट्र)
१८९९ : पंजाब चे माजी मुख्यमंत्री गुरनाम सिंह यांचा जन्म.
१९३८ : भारतीय क्रिकेट खेळाडू आणि पंच फारूक इंजिनिअर यांचा जन्म.
१९४० : बालवाङ्मयकार विनायक कोंडदेव ओक यांचा जन्म. (मृत्यू: ९ ऑक्टोबर १९१४)
१९४३ : जॉर्ज हॅरिसन 'बीटल्स'चा गिटारवादक, संगीतकार, गायक आणि गीतलेखक (मृत्यू: २९ नोव्हेंबर २००१)
१९४८ : डॅनी डेंग्झोप्पा चित्रपट अभिनेते
१९७४ : दिव्या भारती हिन्दी, तामिळ आणि तेलगु चित्रपट अभिनेत्री (मृत्यू: ५ एप्रिल १९९३)
१९८१ : भारतीय अभिनेता अनुज साहनी यांचा जन्म.
१९८१ : भारतीय अभिनेता शहीद कपूर यांचा जन्म.
१९९२ : हिंदी चित्रपट अभिनेत्री सान्या मल्होत्रा यांचा जन्म.
१९९४ : हिंदी चित्रपट अभिनेत्री उर्वशी रौतेला यांचा जन्म.

## मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५९९ : संत एकनाथ (जन्म: ? ? १५३३) भगवंत भक्त संत एकनाथानी पैठण येथे आजच्या दिवशी समाधी
१८८६ – गुजराथी कवी नर्मदाशंकर दवे यांचे निधन हुतात्मा किसन आहिर व नानकसिंग पुण्यतिथी
१९२४ : जमखिंडीचे संस्थानिक सर परशुरामभाऊ पटवर्धन यांना त्यांच्याच मस्तवाल हत्तीने चिरडून ठार केले. त्यांच्या स्मरणार्थ दिलेल्या देणगीनंतर पुण्यातील न्यू पूना कॉलेजचे नाव 'एस. पी. कॉलेज' असे करण्यात आले. (जन्म:)
१९६४ : शांता आपटे चित्रपट अभिनेत्री (कुंकू, दुनिया ना माने, अमृत मंथन इ.) (जन्म:१९१६)
१९७८ : डॉ. प. ल. वैद्य प्राच्यविद्यासंशोधक (जन्म: २९ जून १८९१)
१९८० : गिरजाबाई महादेव केळकर लेखिका व नाटककार (जन्म:)
१९९९ : ग्लेन सीबोर्ग नोबेल पारितोषिक विजेते अमेरिकन रसायनशास्त्रज्ञ (जन्म: १९ एप्रिल १९१२)
२००१ : सर डोनाल्ड ब्रॅडमन ऑस्ट्रेलियन फलंदाज, संघनायक व विक्रमवीर. १९४९ मध्ये त्यांना 'सर' हा किताब देण्यात आला. (जन्म: २७ ऑगस्ट १९०८)
२००७ : मल्याळम कवी पी भास्करन यांचे निधन.
२०१६ : भारतीय उद्योगपती आणि समाजसेवक भवरलाल जैन यांचे निधन. (जन्म: १२ डिसेंबर १९३७)

# पोउप निरीक्षक यांच्या चुकीमुळे शासनाचा महसूल बुडाला

अंबड । प्रतिनिधी

अंबड उपविभागीय अधिकारी व पथक यांनी३१ जानेवारी रोजी पाचोड रोडवरील दोन बरस वाळू असलेलं टिप्पर विना रॉयल्टी पकडण्यात आलं होतं सदरील टिप्पर अंबड तहसील आवारामध्ये लावण्यात आलं होतं सदरील टिप्परवर गुन्हा दाखल असल्या कामी व तपास कामे करता अंबड पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक व इतर पोलीस यांनी अंबड तहसील मधून टिप्पर ताब्यात घेण्यात आले तसेच सदरील वाहनांमधून वाळू खाली करून तपास कामी पोलीस घेऊन गेले होते परंतु नेमाप्रमाणे सदरील टिप्पर तहसील कार्यालया आवारामध्ये लावणे गरजेचे होतं परंतु आता जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक या प्रकरणी का कारवाई करतात हे बघणं गरजेचं आहे. सदरील रिकामा वाहन टिप्पर चालक तसा न करता दंड वाचवण्यासाठी स्वतः मालकाच्या घरी घेऊन गेला या प्रकरणी शासनाच्या पोलीस कर्मचारी अधिकारी यांच्याकडूनच शासनाचा महसूल बुडाला असे म्हणाला हरकत नाही हा सगळा प्रकार अंबड तहसील कार्यातील सीसीटीव्ही मध्ये आहे. अंबड तहसील कार्यालय मार्फत सदरील वाळू टिप्पर मालकाला दंड भरण्यासंदर्भात नोटीस देण्यात येणार आहे असे तहसील कार्यालयाकडून माहिती हाती येत आहे.

३१.०१.२०२५ रोजी सकाळी ०६.०० वाजता मा. उपविभागीय अधिकारी यांच्या उपस्थीत्त अंबड तहसिल कार्यालयाचे गौण खनिज पथक हे गस्तीवर असताना आम्हास पाचोड टोल नाका येथे दोन ब्रास चा वाळु वाहतुक करणारा हायवा दिसुन आला सदर वाहनावर कुठलाही वाहन क्रमां नव्हता तेव्हा वाहन चालकास वाहन थांबवून वाळू वाहतुक परवाना बाबत विचारणा केली असता त्याने तो नसल्याचे सांगितले व सदर वाहन चालकास स्वतः चे नाव विचारले असता त्याने आपले नाव किरण भगवान चाळके असे सांगितले, व वाहनाचा मालका बाबत विचारणा केली असता सदर वाहन हे श्री सुयोग सोळुंके रा गोंदी यांचे मालकीचे असल्याचे किरण भगवान चाळके यांनी सांगितले सदर वाहनाची तपासणी केली असता त्याचा चेसिस क्रमांक ३०८६२ असा दिसून आला तेव्हा सदर वाहन पथकाने आपल्या ताब्यात घेवुन तहसिल कार्यालय अंबड येथे लावण्यात आले आहे असे पंचनाम्यात नमूद करण्यात आले आहे. संदर्भ क्रमांक ०१ अन्वये केलेला अहवालामध्ये अवैधरित्या वाळु वाहतूक करीत असल्याचे नमुद केले आहे,म्हणजेच २ ब्रास अवैधरित्या वाळु या गौण खनिजाचे उत्खनन करुन वाहतुक केले असल्याचे आढळुन आले आहे, जे की, हे नियमबाहय असुन महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ मधील कलम – ४८ (७) व (८), महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनीयमन) नियम– २०१३, महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक ११ मे २०१५, शासन निर्णय दिनांक १४.०६.२०१७, मधील तरतुदीचे उल्लघंन करणारे आहे. त्याअर्थी, उक्त तरतुदीचा भंग केला असल्याने आपले विरुध्द खालील प्रमाणे दंडात्मक कारवाई करुन सदरचे वाहन महाराष्ट्र जमीन महसुल संहीता –१९६६चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम–४८ (७) व ४८ (८) मध्ये विहीत केलेल्या तरतुदीनुसार सदर वाहन जप्त होउन, फौजदारी गुन्हासह / कारवाई करण्यासाठी ताब्यात घेण्यात आले होते.



## चौसाळा येथे महिलांना आरोग्याविषयी मार्गदर्शन

**चौसाळा। प्रतिनिधी**

**बीड तालुक्यातील चौसाळा येथे वडमावली लोकविकास मंच व ईएसपीच्या संयुक्त विद्यमाने महिलांसाठी वातावरणातील बदल, आरोग्य व सामाजिक सुरक्षा याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.**

बीड तालुक्यातील चौसाळा येथे वडमावली लोक विकास मंच व ईएसपी च्या संयुक्त विद्यमाने जवळपास २० गावांमध्ये एक वर्षापासून मार्गदर्शन करण्यात येत आहे. या वीस गावात गरीब, गरजू, मागास, वंचित घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून दिनांक २४ फेब्रुवारी रोजी सोमवारी चौसाळा येथे महिलांसाठी वातावरणातील बदल, आरोग्य विषयक समस्या, सामाजिक सुरक्षा याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी निखिल पावरा यांनी मार्गदर्शन केले यावेळी भास्कर मुंडे,एन.टी. वाघमारे, शिवाजी माने, राजेंद्र शेळके, राघोजी शेंडगे, अलका साळुंके, संजय हराळ आदींची यावेळी उपस्थिती होती. या कार्यक्रमाला दहा गावातील २६ महिला, पुरुष प्रतिनिधी उपस्थित होते.

## तुलसी शैक्षणिक समूहाचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

### विद्यार्थ्यांच्या कलाविष्कारांनी प्रेक्षक, पालकांची मने जिंकली



बीड। प्रतिनिधी

तुलसी शैक्षणिक समूहातील तुलसी कॉम्पुटर सायन्स अँड आयटी कॉलेज, तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, माता रमाई व तुलसी नर्सिंग कॉलेजचे संयुक्त वार्षिक स्नेहसंमेलन शनिवार, दि.२२ रोजी यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात मोठ्या उत्साहात आणि आनंदात पार पडले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांच्या विविध सांस्कृतिक आणि मनोरंजक कलाविष्कारांनी प्रेक्षक आणि पालकांची मने जिंकली.विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नृत्य, गायन, नाटक आणि इतर सांस्कृतिक कार्यक्रमांनी सर्वांचे मनोरंजन केले.कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून छत्रपती संभाजीनगर स्मार्ट सिटीचे उपआयुक्त मा.रविंद्र जोगदंड होते तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी देवगिरी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष मा.प्रा.प्रदीप रोडे होते. विचार मंचावर तुलसी महिला मंडळाच्या अध्यक्ष मा.दिपाताई रोडे, सौ.के.एस.के.महाविद्यालयातील संगीत विभाग प्रमुख मा.प्रो.दीपक जमदाडे, प्रो.डॉ.संजय कांबळे, मा.इंजि.दिपंकर रोडे यांसह प्राचार्य प्रा.डी.जी. निकाळजे, प्राचार्य डॉ.अशोक दुलदुले, प्राचार्य प्रा.मिलिंद वाडमारे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली यावेळी प्राचार्य प्रा.डी.जी. निकाळजे यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात महाविद्यालयाचा वर्षभरातील कार्याचा आढावा घेतला आणि विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक केले.यावेळी मा.रविंद्र जोगदंड मार्गदर्शन करताना म्हणाले की, आज आनंदाचा दिवस आहे. वर्षभर ज्या क्षणांची आपण आतुरतेने वाट पाहत असतो, स्वतःला व्यक्त करण्याची संधी मिळते, ती संधी महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या रूपाने येते. महाविद्यालयाचा काळ हा आपल्या भविष्यातील जडणघडणीचा पाया असतो. त्यामुळे या वेळेचा पुरेपूर उपयोग करून घेणे आवश्यक आहे. रात्रंदिवस एक करून आपल्या करिअरसाठी योगदान दिल्यास, निश्चितच आपले भविष्य उज्ज्वल होईल. आजच्या पिढीला मोठी जबाबदारी पार पाडायची आहे, याचे भान असणे गरजेचे आहे, असे सांगितले.

अध्यक्षीय भाषणांत मा.प्रा.प्रदीप रोडे यांनी,'तुलसी शैक्षणिक समूहाने विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत मोलाची भूमिका बजावली आहे, मला विश्वास आहे की, या संस्थेत शिक्षण घेतलेले विद्यार्थी केवळ प्राध्यापक किंवा प्राचार्यच नाहीत, तर मोठे उद्योजक, कलाकार, वैज्ञानिक, लेखक, समाजसेवक, खेळाडू किंवा इतर कोणत्याही क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाने संस्थेचे नाव मोठे करतील. आणि संस्थेच्या विकासात मोलाची भर घालतील, असे सांगितले.या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेचा आणि कलात्मकतेचे प्रदर्शन झाले. संपूर्ण कार्यक्रम उत्साहवर्धक आणि आनंददायी ठरला. पालकांनीही त्यांच्या मुलांच्या प्रदर्शनाचा आनंद घेतला आणि त्यांच्या प्रयत्नांना प्रोत्साहन दिले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कीर्ती पवार, आदित्य ठोंबरे व तनिष्का आगे यांनी केले तर आभार डॉ.योगिता लांडगे यांनी मानले. कार्यक्रमास तुलसी शैक्षणिक समूहातील सर्व शिक्षक, प्राध्यापक, प्राध्यापकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिथे सगळ्यांची शान समान ते स्मशान-प्रतिक्षा महाराज

जालना। प्रतिनिधी

घनसावंगी येथून जवळच असलेल्या कोठाळा (खुर्द) येथे सुरु असलेल्या संगीतमय शिवमहापुराण कथेत आजच्या दिवसाच्या निरुपणामध्ये कु. प्रतीक्षा महाराज करडूळे यांनी जीवनाचे तत्त्वज्ञान उलगडून दाखवले. जीवनाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन स्पष्ट करताना त्या म्हणाल्या, ''जिथे सर्व समान ते स्मशान.'' स्मशानभूमीतील शांतता, समता आणि त्यातील शिवतत्त्व समजावून सांगताना त्यांनी जीवनाच्या नश्वरतेवर प्रकाश टाकला.



त्यांनी आपल्या कथेतून सकारात्मकता आणि नकारात्मकतेच्या संकल्पना सोप्या उदाहरणांच्या माध्यमातून स्पष्ट केल्या. यासाठी त्यांनी महाभारतातील अर्जुन आणि दुर्योधन यांचा दृष्टिकोन सांगणारा प्रसंग सांगितला. श्रीकृष्णाने अर्जुनाला वाईट व्यक्ती शोधण्यास सांगितले, तर दुर्योधनाला चांगली व्यक्ती शोधण्यास सांगितले. मात्र, अर्जुनाच्या निर्मळ मनामुळे त्याला कोणीही वाईट वाटले नाही, आणि दुर्योधनाच्या नकारात्मक मनोवृत्तीमुळे त्याला कोणीही चांगले वाटले नाही. यावरून जसा दृष्टिकोन तसा अनुभव मिळतो, असे त्यांनी अधोरेखित केले.महाराजांनी भक्ती, ज्ञान, वैराग्य, श्रद्धा आणि विश्वास या तत्त्वांचा सुंदर उलगडा केला. ''देवावरती श्रद्धा ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे आणि त्यासाठी प्रत्येकाने आपला एक इष्ट देव निश्चित करावा,'' असे सांगत त्यांनी 'आपुला तो एक देव करुनी घ्यावा' हे भजन सादर केले. संगीताच्या माध्यमातून त्यांनी भक्तीचा गोडवा आणि श्रद्धेचे महत्त्व पटवून दिले. संगीतमय शिवमहापुराण कथेमध्ये श्रोत्यांनी भक्तिभावाने सहभाग घेतला. महाराजांनी गायलेल्या भक्तिगीतांना प्रेक्षकांनी टाळ्या वाजवत आणि नृत्य करत दाद दिली. यावेळी ह.भ.प. मुकुंद महाराज भवर आणि अशोक काळे महाराज यांनी संगत केली. कथेमध्ये उद्या विशेष आकर्षण म्हणून जिवंत देखाव्याच्या माध्यमातून शंकर–पार्वती विवाह सोहळा सादर केला जाणार आहे. या उत्सवामध्ये परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अखंड हरिनाम सप्ताह कोठाळा (खुर्द) आयोजकांनी केले आहे.

## पोलिसांकडून गुटख्यासह सात लाखाचा मुद्देमाल जप्त

### तालुका पोलीस ठाण्याची धडाकेबाज कारवाई

जालना। प्रतिनिधी

तालुका जालना पोलिसांनी जालना अंबड रस्त्यावर एका कारमधुन १ लाख ३२ हजार ५५० रूपयांचा गुटखा आणि एक स्विफ्ट डिझायर कार असा ७लाखाचा मुद्देमाल जप्त केला आहे. याबाबत अधिक माहीती अशी, तालुका जालना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुरेश उनवणे यांच्या आदेशावरून पोलिसांनी हे आपल्या हद्दीत गस्त घालीत असतांना अंबड रस्त्यावर एक वेगाने व संशवितरित्या जातांना मिळून आल्यानंतर पोलिसांनी तिचा पाठलाग करून त्याला थांबवले. गाडीच्या कागदपत्रांची विचारपुस केली उस्मान शेख रा. अंबड या चालकाने गाडीची कागदपत्रे सोबत नसल्याचे सांगितले.




पोलिसांनी संशय बळावल्यामुळे कार तालुका जालना पोलीस ठाण्यात आणुन गाडीची तपासणी केली असता गाडीमध्ये प्रतिबंधित गुटखा आढळून आला. पो.नि. सुरेश उनवणे यांना कळवुन दोन पंचासमक्ष हा माल जप्त केला. सुगंधित पान मसाला, राजनिवास, विमल आणि जाफरानी जर्दा अशा प्रतिबंधित गुटख्याचा १ लाख ३२ हजार ५५० रूपयांचा गुटखा मिळून आला. पोलिसांनी एमएच. २० ईजे ३५२८ या कारसह एक रेडमी कंपनीचा मोबाईल फोन असा एकुण ७लाख २ हजार ५२० रूपयांचा मुद्देमाल ताब्यात घेवन शेख रा. अंबड याला अटक केली आहे.

## श्री.दत्त संस्थान बालाघाट येथे महाशिवरात्र उत्साहात साजरी होणार

बीड । प्रतिनिधी

श्रीक्षेत्र कपिलधार पासून जवळच असलेल्या श्री.दत्त संस्थान बालाघाट कपिलधारवाडी (मांजरसुंबा) येथे प.पु.ष.ब्र.श्री १०८ शिवानंद शिवाचार्य महाराज तमलुरकर यांच्या कृपाशीर्वादाने व दत्त उपासक श्री. वैजिनाथ महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी बालाघाट डोंगर परिसरात श्री दत्त संस्थान कपिलधारवाडी (मांजरसुंबा) येथे बुधवार दि. २६ फेब्रुवारी २०२५ रोजी महाशिवरात्रीनिमित्त भव्य दिव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. यामध्ये भगवान श्री शंकराला महारुद्र अभिषेक सकाळी होणार आहे. तसेच संगीत भजनाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या संगीत भजनामध्ये संगीत क्षेत्रातील



मान्यवर व्यक्तींची हजेरी राहणार आहे. याबरोबरच या महाशिवरात्रीच्या पूर्व काळानिमित्ताने महारुद्र अभिषेक, आणि महाआरती व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आहे. तरी या सर्व कार्यक्रमाचा लाभ पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी घ्यावा असे संस्थांचे दत्त उपासक श्री. वैजनाथ महाराज शिंदे यांनी कळवले आहे.

## आदित्य पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांनी जाणून घेतले पाणी शुध्द करण्याचे तंत्रज्ञान

### बीड पालिकेच्या ईट येथील जलशुद्धीकरण केंद्राला दिली शैक्षणिक भेट | शहराला पाणी पुरवठा करण्याची प्रक्रिया विद्यार्थ्यांनी केली आत्मसात

बीड। प्रतिनिधी

आदित्य शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबर प्रात्यक्षिक ज्ञानावर भर दिला जातो. त्याचाच एक भाग म्हणून आदित्य पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांनी बीड नगर पालिकेच्या इट येथील जलशुध्दीकेंद्राला भेट देऊन तेथील पाणी शुध्द करण्यापासून तर ते पाणी शहरातील नागरिकांच्या घरात पोहोचण्यापर्यंतची सर्व तांत्रीक पध्दत अवगत करून घेतली. जलशुद्धीकरण केंद्रातील अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.आदित्य पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांनी नगर परिषद बीड अंतर्गत असलेल्या जलशुद्धीकरण केंद्र ईट येथे संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा, आदित्य पॉलिटेक्निक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राहुल खडके यांच्या मार्गदर्शनाखाली भेट दिली. यावेळी महाविद्यालयाचे दुधाळ पी.



डी., खालापुरीकर जी. एम., मुंडे ए. आर., वरपे आर. एस. यांची उपस्थिती होती.

विद्यार्थ्यांनी जलशुद्धीकरण केंद्रामध्ये पाणी शुद्ध कसे केले जाते. त्यामध्ये कोणत्या प्रक्रिया असतात तसेच पाणीपुरवठा कसा केला जातो आणि त्याचे नियोजन कसे करावे या बद्दल सविस्तर माहिती जाणून घेतली. त्यामध्ये तेथील जलशुद्धीकरण केंद्र हे २४ आणि २५ दशलक्ष लिटर क्षमतेचे आहे. हे पाणी माजलगाव येतील बॅक वॉटर मधून पाइपलाइन द्वारे येते. विद्यार्थ्यांनी पहिल्यांदा २४ दशलक्ष लिटर क्षमतेच्या जुन्या प्लाँट ला भेट दिली. प्रथम त्या पाण्याला ह्या प्रोसेस मधून जावे लागते व यावेळी त्यामध्ये वातावरणाशी संपर्क होऊन ऑक्सिजन आणि म्हणजेच तुरटी मिळवली जाते, त्यामुळे त्यातील कार्बन डायऑक्साइड नष्ट होतात. नंतर एका २० फूट खोल टाकीमध्ये जी निमुळती आकारामध्ये असते अश्या टाकीमध्ये पाणी जमा केले जाते. तिथे ची प्रक्रिया होते. ज्यामध्ये पाणी २४ तास स्थिर ठेवून त्यातील गाळ बाहेर काढला जातो. ह्या प्रक्रियेमध्ये पाणी जवळपास ७५ टक्के पर्यंत शुद्ध होते. त्यानंतर वाळू द्वारे पुन्हा त्याचे शुद्धीकरण केले जाते यामध्ये आपण चा वापर करतो तसेच हे याची दररोज वॉशिंग केली जाते. सर्वात शेवटी ते पाणी मध्ये जमा करून त्यामधे ब्लिचिंग पावडर मिक्स करून ४९० पॉवर च्या ५ पंपाकडून शहरासाठी पुरवठा केला जातो. जलशुद्धीकरण केंद्राची ही प्रक्रिया २४ तास चालू असते आणि काही बिघाड होऊ नये तसेच स्वच्छतेची पूर्णपणे काळजी घेतली जाते. नवीन प्लाँट हा २५ दशलक्ष लिटर क्षमतेचा आहे. नवीन प्लाँट मध्ये हे सर्व कामे संगणक प्रक्रियेद्वारे स्वयंचलित होतात आणि विशेष करून सौरऊर्जेवर आधारित आहे त्यामुळे विजेचा खर्च देखील कमी होतो. तेथील प्रभारी अधिकारी हाडुळे, आमटे, सचिन ठोकरे यांनी विद्यार्थांना सखोल मार्गदर्शन केले. जलशुद्धीकरण केंद्राची पूर्णपणे माहिती दिली.

## प्रियदर्शनी बँकेच्या ग्राहक मेळाव्यास खातेदाराकडून मोठा प्रतिसाद



जालना। प्रतिनिधी

जालना शहरासह जिल्ह्यातील प्रसिद्ध असलेली प्रियदर्शनी नागरी सहकारी बँकेच्या मौजे कुंभार पिंपळगाव येथील शाखेच्या नवव्या वर्धापण दिनानिमित्? २२ फेब्रुवारी रोजी आयोजित ग्राहक मेळाव्यास व्यापारी, सभासद, खातेदार आणि हितचिंतकांनी प्रतिसाद दिला.

येथील माऊली मंगल कार्यालयात आयोजित या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी संस्थापक अध्यक्ष माजी आमदार ॲड. विलासबापू खरात यांची उपस्थिती होती तर या ग्राहकास मेळाव्यास प्रमुख पाहुणे म्हणुन बँकेच्या बोर्ड व ऑफ मॅनेजमेंटचे संचालक श्री. विश्वजीत खरात, चेअरमन सी.ए. भूषण मक्कड़, मुख्य कार्यकारी अधिकारी सचिन वाणी, व्हा. चेअरमन बळीराम जिगे तसेच संचालक सुरेशकुमार पंडा, भरतकाका पाटील कंटुले, माणिकराव टेहळे, सी. व्दारकाबाई मेहेत्रे यांच्यासह बाजार समितीचे संचालक दत्तात्रय कंटुले, व्यापारी महासंघाचे अध्यक्ष चत्रभुज आनंदे आदींची उपस्थिती होती. प्रारंभी कुंभार पिंपळगाव शाखेचे व्यवस्थापक विलास खंडागळे यांनी प्रास्ताविक केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शहागड शाखेचे शाखाधिकारी नितीन बोबडे यांनी केले. यावेळी माहेश्वरी समाजाकडून माजी आमदार ॲड. विलासबापु खरात, चेअरमन भुषण भक्कड आणि बँकेच्या संचालक मंडळाचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास बँकेचे खातेदार, हितचिंतक, व्यापारी आणि परिसरातील कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# मतदार यादीचा ठोस पुरावा म्हणून ग्रहीत धरून पिटीआर द्या- दादासाहेब गिरी, ब्रम्हदेव धुरंधरे

**गेवराई । प्रतिनिधी**

**शासन निर्णयानुसार पंतप्रधान आवास घरकुल योजनेंतर्गत गोरगरीबांना लाभ मिळवून देण्यासाठी गेवराई नगरपालिकेकडुन वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिद्ध करीत अतिक्रमण धारकांना आव्हान करण्यात आले असून त्याचे अतिक्रमण धारकांत स्वागत होत आहे पण अनेक वर्षांपासून रहात असलेल्या अतिक्रमण धारकाकडे घरपट्टीची पावती नाही त्यामुळे गोरगरीब अतिक्रमण धारक वंचित रहावुनये म्हणून सं.न. २००९-२०१० ची मतदार यादीतील मतदार असलेल्या अतिक्रमण धारकांना पि.टी.आर देऊन पंतप्रधान आवास योजनेंतर्गत घरकुलाचा लाभ मिळावा म्हणून २०१० ची मतदार यादीच ठोस पुरावा ग्रहीत धरून शहरातील अतिक्रमण धारकास पि.टी.आर वाटप करण्यात यावा अशी मागणी भाजपाचे मा.नगराध्यक्ष ब्रम्हदेव धुरंधरे मा.उपनगराध्यक्ष दादासाहेब गिरी, यानी दिलेल्या निवेदनात केली आहे**

संजयनगर, साठेनगर, संघमित्र नगर येथील अतिक्रमण धारकांना नियमाकुल करण्यासाठी नगरपालिकेकडून जाहीरात द्वारे अतिक्रमण धारकांना आवाहन करण्यात आले होते पण काही अतिक्रमण तिस वर्षांपासून वास्तव्यास आहेत पण पुरावा नाही तरी स.न.२०१० च्या मतदार यादीत नाव असलेल्या अतिक्रमण धारकांना नियमाकुल करून पि.टी.आर वाटप करण्यात यावा या मागणीचे नागरिकांच्या वतिने आज २४ रोजी नगरपालिकेला निवेदन देण्यात आले आहे यावेळी लक्ष्मण चव्हाण, राणा कानाडे, मुरली सुतार दिलीप



सोनवणे, शेख मुददशीर, शेख ईर्शाद, शेख शौकत, प्रभाकर सुतार, साईनाथ पाटोळे, आदी उपस्थित होते. शासन निर्णयानुसार पंतप्रधान आवास योजनेंतर्गत गोरगरीबांना घरकुल योजनेचा लाभ प्रत्येकास मिळावा म्हणून देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र भाई मोदी यांनी शासकीय जागेवरील अतिक्रमण करून रहात असलेल्या अतिक्रमण धारकांना नियमाकुल करून पि.टी.आर देऊन पंतप्रधान आवास योजनेंतर्गत घरकुल योजनेंतर्गत लाभ मिळावे म्हणून सं.न.२११ पुर्वी वास्तव्यास असलेल्या प्रत्येक लाभार्थींना हाक्काचे घर मिळावे म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स.न. २०१८-२०१९ साली शासकीय जागेवर अतिक्रमण करून रहात असलेल्या कुटुंबाना नियमाकुल करून पंतप्रधान आवास योजनेंतर्गत घरकुल मंजुर करावे असा निर्णय झालेला आहे त्या अनुषंगानेच मा.आ.लक्ष्मण आण्णा पवार यांनी यापूर्वीच सरकारच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासनाला भाग पाडुन शहरातील संजयनगर, साठेनगर, संघमित्र नगर, इस्लामपूरा, आदी भागातील अतिक्रमण धारकांना पि.टी.आर मिळवण्यासाठी प्रमाणिक प्रयत्न केले होते. यामध्ये संजयनगर येथील ६०० प्रस्ताव होते त्या पैकी २०७ प्रस्ताव निर्विवाद होते म्हणून पि.टी.आर मिळाला होता तर ३४० कुटुंब रहात असलेल्या जागेवर शासकीय आरक्षण होते तर ७० कुटुंबाचे परिपूर्ण पुरावे नव्हते म्हणून ते पि.टी.आर पासुन वंचित आहेत तर साठेनगर येथील ३०० कुटुंबांना पि.टी.आर मिळाला होता पण तर संजयनगर येथील आरक्षण उठवण्यासाठी मा.आ.लक्ष्मण आण्णा पवार यांनी नगररचनाकार पुणे यांच्याकडे मागणी केली होती ते आरक्षण आत्ता उठवण्यात आले आहे त्यामुळेच वंचित अतिक्रमण धारकांना पि.टी.आर चा मार्ग मोकळा झाला आहे तरी शासन निर्णयानुसार पंतप्रधान आवास योजनेंतर्गत घरकुल मंजुर करण्यासाठीची शासकीय जागेवरील अतिक्रमण धारकांना पि.टी.आर साठी सं.न.२०१०-२०११च्या मतदार यादीतील नाव व अनुक्रमांक हाच ठोस पुरावा ग्रहीत धरून शहरातील अतिक्रमण धारकांना पि.टी.आर वाटप करण्यात यावा अशी मागणी संजयनगर येथील नागरिकांनी निवेदनाद्वारे केली आहे.

## डॉ.श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते वारकरी संगीत संमेलनाचे उद्घाटन

**बीड । प्रतिनिधी**

संगीतोन्मेष संस्था पुणे आणि संत माऊली महाराज संस्थान यांच्या संयुक्त विद्यमाने १७ व्या अखिल भारतीय वारकरी संगीत संमेलनाचे उद्घाटन सुप्रसिद्ध साहित्यिक, माजी संमेलनाध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या शुभहस्ते दि. २६ फेब्रुवारी रोजी दु. २ वा. श्री क्षेत्र चाकरवाडी येथे होत असून, संमेलनाध्यक्ष पं. यादवराज फड. स्वागताध्यक्ष महादेव महाराज तात्या, महंत लक्ष्मण महाराज मेंगडे, उद्योजक बबनराव जायभाए आदी मान्यवर उपस्थितीत



असतील. संमेलनात देण्यात येणारा संगीतरत्न मारोतीबुवा दोंदेकर स्मृती "गीत - नृत्य - वाद्य" पुरस्कार यावर्षी कानपूर येथील राष्ट्रपती पदक प्राप्त जेष्ठ गायक पं. विनोद द्विवेदी यांना महंत लक्ष्मण महाराज मेंगडे यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात येईल. त्यानंतर मौखिक परंपरेवर जीतेंद्र मैड यांचे व्याख्यान होईल. पहिल्या दिवसाची सांगता पं. विनोद द्विवेदी आणि आयुष द्विवेदी यांच्या हिंदी संतवाणीने होईल. यावेळी नानासाहेब कवडे, श्रीकांत फड, राम काजळे, विनोद कवडे यांची सन्माननीय उपस्थिती असणार आहे.दि. २७ फेब्रुवारी ◀◀ पान ३ वर

## मुर्शदपूर येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी शहराचा अविभाज्य घटक असलेल्या मुर्शदपुर गणेश नगर भागात सालाबादप्रमाणे साधु संतांच्या आशीर्वादाने आणि माजी आ.साहेबराव दरेकरनाना यांच्या मार्गदर्शनाखाली आष्टी - मुर्शदपूर (गणेशनगर) येथे दि.२५ फेब्रुवारी ते दि.४ मार्च २०२५ या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा आयोजित केला आहे.

या सप्ताहात टाळ, विणा, पखवाज, ज्ञानेश्वरी ग्रंथ पुजन पांडुरंग शास्त्री देवा (सौताडा), ह.भ.प.दिनकरराव तांदळे महाराज, ह.भ.प.श्रीहरि पुरी



महाराज, ह.भ.प.ब्रम्हचैतन्य तावरे महाराज, ह.भ.प.अशोक महाराज डोके सर, ह.भ.प. रामदास महाराज डोरले यांच्या हस्ते होणार आहे.या सप्ताहात व्यासपीठ चालक म्हणुन ह.भ.प.काशीनाथ महाराज



शेंबडे, ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज जगताप सर हे काम पाहणार आहेत. या सप्ताहात काकडा, ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, हरिपाठ, हरिकीर्तन आदि धार्मिक कार्यक्रम होणार आहेत.या सप्ताहात ह.भ.प. गोविंद महाराज पवार, ह.भ.प. सोनाजी बापु शिंदे महाराज, ह.भ.प.श्रीनिवास महाराज घुगे, ह.भ.प.आदिनाथ महाराज दानवे, शिवचरित्रकार ह.भ.प. दिपालीताई खिळे शास्त्री, ह.भ.प.राम महाराज शास्त्री, ह.भ.प.संतोष महाराज मोरे यांचे हरिकीर्तन होणार आहेत. मंगळवार दि.४ मार्च २०२५ रोजी सकाळी ९ ते ११ यावेळात ह.भ.प.कैलास महाराज भोरे (देवदैठण) यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे या सप्ताहासाठी काही भाविक भक्तांनी भक्तांना दर दिवशी महाप्रसादाच्या पंगत देण्याचे काम केले आहे. या सप्ताहातील अन्नदाते पुढील प्रमाणे एडवोकेट अविनाश शिवाजीराव निंबाळकर श्री भालेराव दत्तात्रेय बाळासाहेब गणेश गिरी अण्णासाहेब चौधरी उद्योजक कै लक्ष्मण लहानु घुमरे यांच्या स्मरणार्थ दिशा कॉम्प्युटर आष्टी कुसुमताई हरिचंद्र शेकडे यांच्या स्मरणार्थ निलेश नामदेव सोनवणे व तुकाराम नामदेव सोनवणे या बंधूंची पंगत सुचिता संदीप कोठुळे अशोक डोके सर ह भ प मातकुळी रवींद्र सूर्यकांत रायते गणेश नगर बांबारसे मेडिकल श्री मनोज रत्नपारखे व आरटी जगताप नोटरी आष्टी तर ह भ प कैलास महाराज भोरे देवदैठण तालुका जामखेड यांचे सुश्राव्य असे काल्याचे किर्तन व नंतर महाप्रसादाची सामुदायिक पंगत होईलअशी माहिती सप्ताह समिती व संयोजक ह.भ.प.धोंडीबापु वांढरे महाराज यांनी दिली.

## युरोपमध्ये होणाऱ्या कुडो वर्ल्ड कप स्पर्धेकरिता सुर्डीच्या सौरभ जाधवची निवड

### आ. विजयसिंह पंडित यांनी सत्कार करुन दिल्या शुभेच्छा!

गेवराई । प्रतिनिधी

युरोपमध्ये होणाऱ्या कुडो वर्ल्डकप स्पर्धेसाठी गेवराई विधानसभा मतदारसंघातील सुर्डीच्या सौरभ जाधव यांची निवड झाली असून आ. विजयसिंह पंडित यांनी सौरभचा जाहीर सत्कार करून स्पर्धेसाठी जाणाऱ्या सौरभ जाधवचा गेवराई विधानसभा मतदार संघाला अभिमान आहे अशी प्रतिक्रिया विजयसिंह पंडित



यांनी यावेळी दिली.

युरोपमध्ये होणाऱ्या कुडो वर्ल्ड कप स्पर्धेसाठी शनिवार दि. ७ फेब्रुवारी रोजी ॲथलेटीका फिटनेस, सूरत येथे वर्ल्ड कप निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले होते, त्यात भारतातील एकूण २६ राज्यातील कुडो राष्ट्रीय विजेत्या स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. त्यात बीड जिल्ह्यामधून महाराष्ट्र राज्यामार्फत ◀◀ पान ३ वर

## स्वातंत्र्यवीर सावरकर हे विज्ञाननिष्ठ राष्ट्रभक्त होते - अक्षय जोग

**माजलगाव । प्रतिनिधी**

प. पू. गोळवलकर गुरुजी व्याख्यान मालेचे तिसरे पुष्प, स्वातंत्र्यवीर सावरकर आक्षेप आणि वास्तव या गुंफताना अक्षय जोग ( स्वातंत्र्यवीर सावरकर संशोधक, अभ्यासक, लेखक, विश्व संवाद केंद्र पश्चिम महाराष्ट्र कार्यकारिणी सदस्य) यांनी सांगितले की, स्वातंत्र्यवीर सावरकर हे विज्ञाननिष्ठ राष्ट्रभक्त होते, भारताला स्वातंत्र्य मिळावे हे उदात्त हेतूने त्यांनी आपले आयुष्य ब्रिटीशांविरुध्द लढण्यासाठी वेचले त्यांनी युद्धनीती बद्दल सांगताना म्हणाले युद्धभूमी नुसार रणनीती आखली पाहिजे. राष्ट्रीय ऐक्य व अखंडत्व अबाधित ठेवून स्वातंत्र्य मिळावे यासाठी संपूर्ण आयुष्यभर कायद्याच्या चौकटीत राहून कार्य करत राहिले, स्वातंत्र्यवीर



सावरकर हे कायदेतज्ज्ञ होते. या सत्राची सुरुवात दिपप्रज्वलन, भारत माता, प. पू. गोळवलकर गुरुजी व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करुन झाले. या सत्राचे अध्यक्ष राम कुलकर्णी (केंद्रीय कार्यकारिणी सदस्य- भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, अंबाजोगाई) तर व्यासपीठावर व्याख्यानमाला समितीचे अध्यक्ष प्रशांत भानप, श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे कार्यवाह अड विश्वास जोशी इत्यादी उपस्थित होते. या सत्राचे अध्यक्षीय समारोप करताना राम कुलकर्णी यांनी सांगितले ◀◀ पान ३ वर

## 'प्लास्टिक मुक्त बीड' अभियान उत्साहात

बीड । प्रतिनिधी

संत गाडगेबाबा जयंतीनिमित्त आज बीड शहरात "प्लास्टिक मुक्त बीड" अभियान मोठ्या उत्साहात पार पडले. या उपक्रमाअंतर्गत भाजी मंडई व जुना मोंढा येथे प्लास्टिक कचरा संकलन व स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

सकाळी ८ वाजता काकू नाना मंडई येथे प्रारंभ झालेल्या या अभियानात स्वच्छता संदेश देणाऱ्या घोषणांनी वातावरण भारून गेले. आनंदग्रामच्या युवा कार्यकर्त्यांनी प्लास्टिक कचरा





गोळा करत, नागरिकांना प्लास्टिक मुक्त जीवनशैलीचे महत्त्व पटवून दिले. या वेळी उपस्थित नागरिक आणि व्यावसायिकांनी प्लास्टिक मुक्तीची सामूहिक शपथ घेतली.

या अभियानाचे आयोजन इन्फंट इंडिया - आनंदग्रामतर्फे दत्ता बारगजे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. गेल्या अनेक वर्षांपासून विविध सामाजिक उपक्रम हाती घेणाऱ्या आनंदग्रामने प्लास्टिक मुक्तीच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. ◀◀ पान ३ वर

## कोरोना काळात रूग्णवाहीकेची सेवा देणाऱ्या वाहनधारकांची थकीत बीले तात्काळ अदा करावीत

### जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांची मागणी

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यामध्ये प्रशासनाने कोव्हीड-१९ काळामध्ये जिल्हाधिकारी साहेब यांच्या आदेशाने वापरलेल्या खाजगी रूगनवाहिका व खाजगी वाहन यांच्या गाड्यांची मा. जिल्हा आरोग्य अधिकारी साहेब यांच्या कार्यालयाकडून बिले सण २०२० पासून थकीत आहेत.थकित बीले मिळावित यासाठी रुग्णवाहिका



मालकांनी अनेक वेळा बीड जिल्हा संबंधित अधिकाऱ्यांशी पत्रव्यवहार केला, उपोषणे सुद्धा केली परंतु बिलाची थकीत रक्कम त्यांना मिळाली नाही. यामुळे त्यांच्यातील काही रुग्णवाहिका मालकांनी आज शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांची भेट घेतली व हा सर्व प्रकार त्यांना कळवळा असता शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी तात्काळ लगेचच बीड जिल्हा निवासी उपजिल्हाधिकारी स्वामी सर यांची भेट घेऊन वाहन मालकांचे ◀◀ पान ३ वर

## राष्ट्रसंत भगवानबाबांनी अध्यात्म आणि समाज सुधारणेचे महान कार्य केले -ह.भ.प. अंजलीताई केंद्रे

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रसंत भगवान बाबा यांचे अध्यात्माबरोबरच समाज सुधारण्याचे मोठे कार्य केले. एकर विका पण शाळा शिका असा मूलमंत्र देऊन त्यांनी समाजाला शिक्षणाचे महत्त्व समजावून सांगितले. कीर्तनाच्या माध्यमातून समाज प्रबोधन करून त्यांनी समाजाला दिशा दिली. संत भगवानबाबा यांनी अध्यात्म आणि समाज सुधारण्याच्या माध्यमातून सुगंध देण्याचे कार्य केले. असे प्रतिपादन स्वररत्न भागवताचार्य वाणीभूषण ह.भ.प. अंजलीताई केंद्रे यांनी केले.







बीड येथील श्रीसंत भगवानबाबा सामाजिक प्रतिष्ठान वर दिनांक २० फेब्रुवारी पासून सुरू असलेल्या सर्व धर्मासमभाव अखंड हरिनाम सप्ताहात तुम्ही संत मायबाप कृपावंत, काय पतीत कीर्ती वाणू, या जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या अभंगावर भागवताचार्य तथा रामायणाचार्य स्वर रत्न ह.भ.प. अंजलीताई केंद्रे यांनी निरूपण केले. याप्रसंगी किर्तनात बोलताना ह.भ.प. अंजलीताई केंद्रे म्हणाल्या, संतश्रेष्ठ भगवानबाबा यांचे चमत्कार अलौकिक व अगणित आहेत भाग्यवान होण्यासाठी स्वतः पुण्यवंत असावे लागते. मायबाप पुण्यवंत असतात. बाबांच्या जीवन दुःखात गेले. त्यांनी सहन ते केलं. संत हे अपमान, दुःख आणि वेदना सहन करत असतात. सहन करणे हे शिकले पाहिजे. सहन केल्याने संत देवाकडे पोहोचले. प्रत्येकाने माणूस म्हणून जगायला शिकले पाहिजे. संतांनी समाजाला दिशा दिली. त्यांनी मृत्यूवर विजय मिळविला. ज्ञानेश्वरी ग्रंथ प्रत्येकाच्या घरी असला पाहिजे. ज्ञानेश्वरी ग्रंथ जगात सर्वश्रेष्ठ आहे. दुःख वाटून घेतल्याने समाधान आणि आनंद मिळतो. संत निवृत्तीनाथ ज्ञानेश्वर माऊली सोपानदेव आणि मुक्ताबाई ही महाराष्ट्राची संपत्ती आहे साधू साधूत व त्यागाने माखली आहे. गुरु चरणावर भाव आणि श्रद्धा ठेवली पाहिजे. मुलं शिकावीत मुलं घडावीत. जीवन कर्तव्यभूमी आहे. प्रत्येकाने मायबापांना विसरू नये, असे सांगून अंजलीताई केंद्रे महाराज यांनी विविध दृष्टांत देऊन भाविकांना मंत्रमुग्ध केले. आपला कीर्तनातून त्यांनी आई-वडिलांचे सेवा, समाजसेवा आणि देशप्रेम याविषयी बहुमोल मार्गदर्शन केले. गानाचार्य ह.भ.प. बंडू महाराज जटाळ आणि वैजनाथ महाराज सानप, यांनी चाल गायन केले. मृदंगाचार्य ह.भ.प. कृष्णा महाराज सानप यांचे कीर्तनकार अंजलीताई केंद्रे यांच्यासह उपस्थित भाविकांनी टाळ्यांच्या ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# येरवडा पोलिसांची दुहेरी कारवाई; वाहने चोरणाऱ्या चोरट्यांना ठोकल्या बेड्या

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यात चोरट्यांनी धुमाकूळ घातला असून, वेगवेगळ्या भागातून चोरीच्या घटना उघडकीस येत असतात. अशातचं आता पुणे जिल्ह्यातून एक मोठी बातमी समोर आली आहे. येरवडा पोलिसांनी दुहेरी कारवाई करत जबरी चोऱ्या करणाऱ्या तसेच वाहने चोरणाऱ्या चोरट्यांना बेड्या ठोकल्या आहेत. दोन कारवाईत पोलिसांनी चौघांना बेड्या ठोकल्या असून, त्यांच्याकडून ऑटोरिक्षा, सोन्याची चैन तसेच एक वाहन चोरीचा गुन्हा उघडकीस आणला आहे.



वाहन चोरी करणाऱ्या सुरज संतोष माने (वय २४, रा. रामनगर, येरवडा) याला पोलिसांनी अटक केली आहे. तर जबरी चोरी प्रकरणात आसिफ अजगर शेख (वय ३२), रा. कुलदिंपसिंग युवराजसिंग जुनी (वय २३) व मख्खनसिंग लाखनसिंग जुनी (वय ३२) यांना अटक केली आहे. ही कारवाई परिमंडळ चारचे उपायुक्त हिम्मत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ निरीक्षक रविंद्र शेळके, पोलीस निरीक्षक )गुन्हे) पल्लवी मेहेर तसेच सहाय्यक निरीक्षक सुनिल साळुंखे व त्यांच्या पथकाने केली आहे.

शहरातील वाढत्या गुन्ह्यांना पायबंद घालण्यासाठी स्थानिक पोलीस हद्दीत गास्त घालत आहेत. यादरम्यान, येरवडा पोलिसांचे पथक गस्त घालत होते. तेव्हा संगमवाडी येथील पुलावर नागरिकांना लुटणारे तिघे संगमवाडीत थांबलेले आहेत, अशी माहिती मिळाली, या माहितीनुसार पथकाने याठिकाणी धाव घेतली. तसेच, सापळा रचून आसिफ, कुलदिंपसिंग व मख्खनसिंग जुनी यांना अटक केली असून, ते सराईत गुन्हेगार असल्याचे सांगितले जाते. त्यांच्याकडून पावणे दोन लाखांचा ऐवज जप्त केला आहे. तसेच चोरीची दुचाकी विक्री करण्यासाठी आलेल्या सुरज माने याला पोलिसांनी रंगेहात पकडले. त्याच्याकडून पोलिसांनी एक दुचाकी जप्त केली आहे.

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने पटकावले सर्वसाधारण उपविजेतेपद



**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव स्पर्धांचे गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे नुकतेच आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये विद्यापीठाच्या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत सर्वसाधारण उपविजेतेपद पटकावले आहे. यामध्ये बास्केटबॉल मुले, कबड्डी मुले, व्हॉलीबॉल मुली, बॅडमिंटन मुली यांनी सुवर्ण, तर हॉलीबॉल मुले, बुद्धिबळ मुले, थलेटिक्स मुले यांनी रोप्य पदक तसेच टेबल टेनिस मुली व खोखो मुली या संघांनी कास्यपदक संपादन केले. या स्पर्धेसाठी राज्यातील २३ विद्यापीठाने सहभाग नोंदविला होता. विद्यापीठाची क्रीडा महोत्सव स्पर्धा जिंकण्याची परंपरा विद्यापीठाच्या खेळाडूंनी कायम राखत विद्यापीठास सर्वसाधारण उपविजेतेपद मिळवून दिल्याबद्दल विजयी खेळाडूंचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पराग काळकर तसेच प्रभारी कुलसचिव प्रा. डॉ. ज्योती भाकरे यांनी अभिनंदन केले.

या स्पर्धेमध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे थलेटिक्स, बॅडमिंटन, टेबल टेनिस, बुद्धिबळ, खोखो, व्हॉलीबॉल, कबड्डी, बास्केटबॉल मुले व मुली संघातील सुमारे १५० खेळाडू व २५ संघ व्यवस्थापक व मार्गदर्शक यांचा चमू सहभागी झाला होता.

# बहुळ गावात घरफोडीचा थरार ! प्रतिकार करणाऱ्या दाम्पत्याला चाकूने भोसकले

**पिंपरी । प्रतिनिधी**

खेड तालुक्यातील बहुळ गावात मध्यरात्री दरोडेखोरांनी धुमाकूळ घालून एका कुटुंबाला चाकूच्या धाकावर ओलीस धरले. वृद्धांना धमकावून दागिने आणि रोकड लुटल्यानंतर, तरुण दाम्पत्याने प्रतिकार करताच चोरट्यांनी त्यांच्यावर थेट चाकूने जीवघेणा हल्ला चढवला. या घटनेमुळे संपूर्ण गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, पिंपरी- चिंचवड पोलिसांनी याची गंभीर दखल घेतली आहे.



जयराम लक्ष्मण वाडेकर (वय ६७) हे आपल्या कुटुंबासोबत बहुळ गावातील फुलसुंदर वस्ती येथे राहतात. त्यांच्या कुटुंबात पत्नी शालन (वय ६५), मुलगा अशोक (वय ३५), सून उज्वला (वय ३२) आणि दोन लहान नातवंडे आहेत. जयराम वाडेकर शेती करतात, तर त्यांचा मुलगा अशोक सणसवाडी येथील कंपनीत नोकरी करतो.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवारी (दि. २३) अशोक आणि उज्वला हे शिवनेरी येथे दर्शनासाठी गेले होते. रात्री १० वाजण्याच्या सुमारास ते घरी परतल्यानंतर कुटुंबाने जेवण करून झोप घेतली. मध्यरात्री अचानक पाच-सहा चोरट्यांनी घराचा दरवाजा तोडून आत प्रवेश केला. झोपलेल्या जयराम वाडेकर यांना अचानक पत्र्याच्या पेटीचा आवाज आल्याने जाग आली. त्यांनी पाहिले असता, २० ते २५ वयोगटातील जाडसर, सावळ्या वर्णाचा एक चोरटा हातात धारदार चाकू घेऊन त्यांच्याजवळ बसला होता. गप्प राहा, नाहीतर चाकू भोसकतो! अशी धमकी देत त्याने त्यांना जागेवरून हलण्यास मज्जाव केला. दरम्यान, इतर दोन चोरटे खोलीतील कपाटे आणि पेट्या फोडत होते. हॉलमध्ये झोपलेल्या शालन वाडेकर यांनी आवाज ऐकून घाबरत चोरट्यांना काय घ्यायचे ते घ्या, पण आम्हाला मारू नका! अशी विनवणी केली. मात्र, तरीही चोरट्यांनी हात उचलत त्यांच्या अंगावरील दागिने हिसकावले. जयराम आणि शालन यांचा ऐवज काढून घेतल्यानंतर चोरटे शांत बसले नाहीत. त्यांनी अशोक आणि उज्वला यांच्या बेडरूमचा दरवाजा कटावणीच्या साहाय्याने तोडला. अचानक दरवाजा उघडल्याने अशोक आणि उज्वला जागे झाले. प्रतिकार करताच, चोरट्यांनी दोघांच्या पोटात थेट चाकू भोसकला, रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या दाम्पत्याने मदतीसाठी आरडाओरड केली. त्यावेळी शालन वाडेकर यांनी मुलाला व सूनेला वाचवण्यासाठी धाव घेतली, मात्र, चोरट्यांपैकी एकाने त्यांना काठीने मारहाण केली. यामध्ये चोरट्यांनी १ लाख ३२ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने आणि १२ हजार रुपये रोख रक्कम लंपास केली आहे. हल्ल्यानंतर चोरटे घाईघाईने पळून गेले. जाताना त्यांनी घराची बाहेरून कडी लावून घेतली.

# पौडला कार अपघातात एक ठार, पाच जखमी

**पौड । प्रतिनिधी**

पौड (ता. मुळशी) येथे शासकीय गोदामासमोर दोन कारच्या अपघातात एकाचा मृत्यू झाला. या अपघातात पाच जण गंभीर जखमी झाले. पौड पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार कार ही मुळशीकडून पौडकडे जात होती. दुसरी कार पौडकडून मुळशीकडे चालली होती.



रात्री बाराच्या सुमारास या दोन्ही गाड्यांची धडक झाली. त्यात तुषार रवींद्र घुमे (वय ३४), संदेश दत्तात्रय कुडले व तुषार अंकुश वाघवले (तिघेही रा. पौड, ता. मुळशी) हे गंभीर जखमी झाले. तिघांनाही पौड ग्रामीण रुग्णालयात उपचारांसाठी दाखल करण्यात आले.

मात्र, तुषार घुमे याचा उपचारांपूर्वीच मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. संदेश कुडले व तुषार वाघवले यांना पुण्यातील खासगी रुग्णालयात उपचारांसाठी हलविण्यात आले. तुषार घुमे हा कोळवण येथील युनियन बँकेत रोखपाल म्हणून कामाला होता. त्याच्या मनमिळावू स्वभावामुळे त्याचा मित्रवर्ग मोठा होता. त्याच्या मृत्यूमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात आली.

दुसर्या कारमधील अजय बंडू राठोड, अरविंद वसंत जाधव, शुभम राठोड (सर्व रा. उजना, अहमदपूर) हे गंभीर जखमी झाले. त्यांना उपचारांसाठी पुण्यात दाखल करण्यात आले. याप्रकरणी रवींद्र काशिनाथ घुमे (वय ६३, रा. पौड कॉम्पलेक्स, ता. मुळशी) यांनी फिर्याद दिली आहे. पौड येथे बसस्थानक, नपाते फाउंडेशन व झील स्कूलसमोर रस्त्यावर रम्बलर लावण्यात आले आहेत. मात्र, यावर गाड्या जोरात आदळत आहेत. यामुळे गाड्यांचे नुकसान होत असून, अपघाताला आमंत्रण मिळत आहे. पौड येथे झालेला अपघात याच रम्बलरमुळे झाला असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

# मंत्री मुरलीधर मोहोळांच्या कार्यकर्त्याला मारहाण प्रकरण, गजा मारणेला कोथरुड पोलिसांकडून अटक

**पुणे । प्रतिनिधी**

केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ (णपळेप चळपळींशी चींरश्रळवहरी चेहेश्र) यांच्या कार्यकर्त्याला मारहाण केल्याप्रकरणी आरोपी गजा मारणेला कोथरुड पोलिसांकडून अटक करण्यात आली आहे. केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांचे निकटवर्ती आहेत देवेंद्र जोग यांना मारहाण केल्याप्रकरणी ही अटक करण्यात आली आहे. कोथरुड पोलिसांनी गजा मारणेला अटक केली आहे. गजा मारणे बरोबरच इतर आरोपींचांही कोथरुड पोलिसांकडून शोध सुरु आहे.



गजानन मारणेला पोलिसांनी अटक केली आहे. यापूर्वी ३ आरोपींना अटक केली होती, आणखी २ आरोपी फरार आहेत त्यांचा शोध सुरू असल्याची माहिती पोलीस उपायुक्त संभाजी कदम यांनी दिली आहे. गजा मारणेची संपूर्ण चौकशी झाल्यानंतर उद्या कोर्टात हजर केलं जाणार आहे. पुण्यातील कोथरूड परिसरात शिवजयंतीच्या दिवशी मुरलीधर मोहोळ यांचे निकटवर्ती असलेले देवेंद्र जोग यांना मारहाण केल्याप्रकरणी गजा मारणेला अटक केली आहे.

कोथरूड परिसरात गाडीचा धक्का लागल्याने जाब विचारल्यामुळे एका तरुणाला चार जणांनी बेदम मारहाण केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला.१९ फेब्रुवारी रोजी कोथरूड परिसरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापासून मिरवणूक निघाली होती, त्यावेळी मिरवणुकीच्या दरम्यान चार जणांनी बाईकवरून जाणाऱ्या देवेंद्र जोग यांना कट मारला. देवेंद्र जोग यांच्याशी त्या चार जणांची वादविवाद झाला आणि त्यामुळे ते चौघे मिळून देवेंद्र जोग यांना बेदम मारहाण केली. या प्रकरणी कोथरूड पोलिसांनी चौघांविरुद्ध गंभीर कलम ३०७ (खून करण्याचा प्रयत्न) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. कोथरूड पोलिसांनी तीन आरोपींना अटक केली आहे, तर चौथा आरोपी बाबू पवार फरार आहे. बाबू पवार हा कुख्यात गुंड गजानन मारणेचा भाचा असल्याचे सांगण्यात आले आहे. या प्रकरणात आरोपी म्हणून अमोल विनायक तापकीर, ओम तीर्थराम धर्म जिज्ञासू, किरण कोंडीबा पडवळ, आणि बाबू पवार यांचे नावे समोर आले आहेत. यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# थकीत बिलांच्या मुद्यावरून शासकीय कंत्राटदार आक्रमक, पुण्यात करणार आंदोलन

**पुणे । प्रतिनिधी**

थकीत बिलांच्या मागणीसाठी शासकीय कंत्राटदार पुण्यात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य अभियंता कार्यालयाबाहेर गुरुवारी (दि.२७) धरणे आंदोलन करणार आहेत.



या आंदोलनात सातारा, सांगली, कोल्हापूर व पुणे जिल्ह्यातील कंत्राटदार सहभागी होणार आहेत, अशी माहिती पुणे जिल्हा काँट्रॅक्टर्स असोसिएशनचे अध्यक्ष रवींद्र भोसले व हॉटमिक्स असोसिएशनचे संजीव पंजाबी यांनी दिली.


राज्यभरातील कंत्राटदारांची हजारो कोटींची देयके प्रलंबित असून त्यामुळे कंत्राटदार आर्थिक अडचणीत सापडले आहेत. सार्वजनिक बांधकाम, ग्रामविकास, नगरविकास,जलसंपदा विभाग आदी सर्वच विभागात कंत्राटदारांची देयके रखडली असून काही ठिकाणी कंत्राटदारानी निधीअभावी कामे थांबविली आहेत.

रस्त्यांची व महामार्गांची कामे करणाऱ्या हॉटमिक्स कंत्राटदारांची अवस्था खूप बिकट झाली असून त्यांना डांबर प्लँट बंद ठेवावे लागत आहेत, पैशा अभावी मशिनरी जागेवर उभ्या केल्या असल्याची माहिती संजीव पंजाबी यांनी दिली. पुण्यात शासकीय इमारतीच्या देखभाल दुरुस्तीची बिले प्रचंड प्रमाणावर थकली आहेत. या व इतर मागण्यांसाठी पुण्यात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य अभियंता कार्यालयाबाहेर गुरुवारी (दि.२७) आंदोलन करण्यात येणार असल्याचे रवींद्र भोसले यांनी सांगितले.

# गांजा तस्करी करणाऱ्या महिलेसह तिघांना बेड्या; अंमली पदार्थ विरोधी पथकाची मोठी कारवाई

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी- चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने गांजा तस्करी करणाऱ्या महिलेसह एकूण तीन जणांना अटक केली आहे. आरोपींकडून ९६ किलो गांजा आणि दोन चार चाकी वाहनासह ६३ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई चाकण पोलीस ठाण्याच्या हद्दीत करण्यात आली आहे. संजय पांडुरंग मोहिते, मनसाराम नूरजी धानका यांच्यासह महिलेला अटक करण्यात आली आहे.



सहाय्यक पोलीस निरीक्षक विक्रम गायकवाड हे पोलीस अंमलदार निखिल वर्पे यांच्यासह गस्त घालत होते. दोन चार चाकी वाहनांमधून गांजाची तस्करी केली जात आहे, अशी गुप्त माहिती त्यांना मिळाली. पुणे- नाशिक महामार्गावरील रोहकल फाटा या ठिकाणी नाकाबंदी करून दोन्ही वाहन ताब्यात घेण्यात आली. दोन्ही वाहनातील एकूण तीन जणांना पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. त्यांच्याकडे विचारपूस करण्यात आली. यात एका महिलेचा देखील समावेश होता.

अंमली पदार्थ विरोधी पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांच्या समक्ष वाहन तपासल्यानंतर दोन्ही वाहनात एकूण सहा पोत्यांमध्ये ९६ किलो २०४ ग्रॅम गांजा आढळून आला. संजय पांडुरंग मोहिते, मनसाराम नूरजी धानका यांच्यासह महिलेला अटक करण्यात आली आहे. यापैकी संजय मोहिते याच्यावर कामशेत आणि लोणी काळभोर पोलीस ठाण्यात एनडीपीएस अंतर्गत गुन्हे दाखल आहेत. ही कारवाई पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे.

# वीजपुरवठा सुरळीत करा, अन्यथा आंदोलन; स्वाभिमानी शेतकरी संघटनेचा महावितरणला इशारा

नारायणगाव: जुन्नर तालुक्यामध्ये गेल्या पंधरा दिवसांपासून विजेचे वेळापत्रक कोलमडले आहे. त्यामुळे शेतकर्यांना शेतीला पाणी देणे अवघड होऊन बसले आहे. विजेच्या या लपंडावामुळे शेतकरी त्रस्त झाले आहेत. वीजपुरवठा सुरळीत करावा; अन्यथा आंदोलन करावे लागेल, असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेने दिला आहे.



जुन्नर तालुक्यात दिवसाही वीजपुरवठा होत नाही. महावितरणने जाहीर केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे सुद्धा वीजपुरवठा होत नाही. आर्वी, गुंजाळवाडी, पिंपळगाव सावरगाव, बस्ती या परिसरामध्ये सध्या मोठ्या प्रमाणात विजेचा लपंडाव सुरू आहे. कांदा, गहू व इतर तरकारी पिकांना पाण्याची गरज जास्त असते.

कोथिंबीर, मेथी या पिकाला तर दिवसाला पाणी द्यावे लागते. परंतु, वीजपुरवठा सुरळीत होत नसल्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. जुन्नर तालुक्यातील अनेक गावांमध्ये बिबट्यांचा उपद्रव आहे. काही गावे तर बिबट्यांसाठी हॉटस्पॉट बनली आहेत. त्यामुळे रात्री पिकाला पाणी देणे शेतकर्यांना शक्य होत नाही. त्यात सध्या उन्हाळ्याची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असून कोवळ्या पिकाला उन्हाचा तडाखा बसत आहे. विजेचा पुरवठा सुरळीत होत नसल्याने पिकाला पाणी देणे शक्य होत नाही. त्यामुळे महावितरण कंपनीने वीजपुरवठा सुरळीत करावा; अन्यथा शेतकरी संघटनेला आंदोलन करावे लागेल, असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रभाकर बांगर यांनी दिला आहे.

# देवदूतच बनला हैवान! डॉक्टरने रुग्ण महिलेकडे केली शरीरसुखाची मागणी

**शिक्रापूर । प्रतिनिधी**

शिक्रापूरमधील शिरुर येथील एक महिला न्हावरा येथे उपचारासाठी दाखल असताना हॉस्पिटल मधील डॉक्टरने रुग्ण महिलेकडे शरीरसुखाची मागणी करत विनयभंग केल्याची घटना घडली आहे. द्रमयाब सदर डॉक्टरला न्यायालयाने दोन वर्षे कारावास आणि तीस हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली असून डॉ. रामहरी भुजंगराव लाड असे शिक्षा सुनावलेल्या डॉक्टरचे नाव आहे.



शिक्रापूर ता. शिरूर येथील महिला ऑगस्ट २०२० मध्ये न्हावरा येथील डॉ. रामहरी लाड यांच्या नाथकृपा हॉस्पिटलमध्ये उपचार घेत असताना रात्रीच्या वेळी डॉ. रामहरी लाड यांनी महिलेला तपासणी करण्यासाठी केबिनमध्ये बोलावून घेतले. त्यानंतर महिलेला गुप्तांगातून तपासणी करायची सांगत महिलेकडे शरीरसुखाची मागणी करत महिलेचा विनयभंग केला. दरम्यान महिलेने डॉक्टरला ढकलून देत बाहेर आपल्या पालकांना माहिती दिली. त्यानंतर शिरुर पोलिस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी न्हावरा येथील नाथकृपा हॉस्पिटल चे संचालक डॉ. रामहरी भुजंगराव लाड वय ४६ वर्षे रा. न्हावरा ता. शिरूर जि. पुणे यांच्याविरुद्ध विनयभंग प्रकरणी गुन्हा दाखल केला होता.

दरम्यान तत्कालीन पोलीस निरीक्षक प्रवीण खानापुरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक सुनील मोटे यांनी आरोपीबाबत योग्य पुरावे व साक्षीदार न्यायलयात हजर केले असता अखेर जिल्हा सत्र न्यायालय जे. ए. झारी यांनी आरोपी डॉ. रामहरी लाड यास दोन वर्षे कारावास आणि तीस हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली, तर गुन्ह्यात सरकारी वकील म्हणून माया क्षिरसागर - जाधव यांनी काम पाहिले तर महिला पोलीस अंमलदार एम एस फंड, पी. एस. वाघमारे, पी. एस. वाडेकर तसेच पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांनी विशेष कामगिरी बजावली. तर शिरुर तालुक्यातील बड्या डॉक्टरला न्यायालयाने दोषी ठरवत शिक्षा सुनावल्याने खळबळ उडाली आहे

# मुस्लिम समाजाने व्यवसायात भरारी घ्यावी-सुनेत्रा पवार

**बारामती । प्रतिनिधी**

मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाकडून मिळालेल्या कर्ज निधीतून मुस्लिम समाजाने उद्योग-व्यवसायात भरारी घ्यावी, असे आवाहन सुनेत्रा पवार यांनी केले. बारामतीतील राष्ट्रवादी भवनात मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळातर्फे धनादेश वाटप कार्यक्रमात त्या बोलत होत्या.



या वेळी महामंडळाचे चेअरमन मुश्ताक अंतुले, संचालक सलीम सारंग, कार्यकारी संचालक गफार मगदूम, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष राजवर्धन शिंदे, जिल्हा बँकेचे संचालक संभाजी होळकर, बारामती बँकेचे चेअरमन सचिन सातव, माळेगाव कारखान्याचे उपाध्यक्ष राजेंद्र ढवाण, राष्ट्रवादी युवक शहराध्यक्ष अविनाश बांदल, महिलाध्यक्षा अनिता गायकवाड, बारामती बँकेचे संचालक ॲड. शिरीष कुलकर्णी, दिलीप ढवाण, नितीन शेंडे, तैनूर शेख, माजी नगरसेविका अनिता जगताप, सविता जाधव, यास्मीन बागवान आदी उपस्थित होते.

खासदार पवार म्हणाल्या, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सहकार्यातून बारामतीत छोटच्या व्यावसायिकांना प्रत्येकी ३ लाखांची रक्कम मिळाली आहे. यातून त्यांच्या व्यवसायाला चालना मिळणार आहे. या रकमेचा योग्यरीत्या वापर करून त्याची मुदतीत परतफेड करावी. हा निधी गरजूंपर्यंत पोहचविण्यासाठी मुस्लिम बँकेचे संचालक अल्ताफ सय्यद व एकता ग्रुपने घेतलेल्या परिश्रमाचे त्यांनी कौतुक केले.

अंतुले म्हणाले, जिल्ह्यातून जेवढे प्रस्ताव महामंडळाकडे येतात तेवढे इतर जिल्ह्यांतून येत नाहीत. या योजनेसाठी मोलाचे सहकार्य करणार्या मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाचे अधिकारी व कर्मचार्यांचा सत्कार खासदार पवार यांच्या हस्ते पार पडला. प्रास्ताविक अल्ताफ सय्यद यांनी केले. सूत्रसंचालन कमरुद्दीन सय्यद यांनी केले. सुभान कुरेशी यांनी आभार मानले.